# श्री. सुभाष देसाई, मा. मंत्री (उद्योग) यांनी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांची मौजे गोंदेदुमाला आणि वाडिवरे, ता. इगतपुरी, जि. नाशिक येथील अधिग्रहीत जमीन गैर अधिसूचीत करण्याच्या घेतलेल्या निर्णयाबाबत एक सदस्यीय चौकशी समितीचा अहवाल

## (खंड १/३)

श्री. के.पी. बक्षी,

निवृत्त अपर मुख्य सचिव

दिनांक : २० मार्च, २०१८

# अनुक्रमणिका


| क्र. | प्रकरण | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १. | प्रस्तावना | १ |
| २. | समितीची संरचना व कार्यकक्षा | २ |
| ३. | समितीने स्वीकारलेली कार्यप्रणाली. | ३ |
| ४. | म.औ.वि.म. अधिनियम, नियम, शासन निर्णय, परिपत्रक, राजपत्र इत्यादी यामधील महत्त्वाच्या तरतुदी | १४ |
| ५. | चौकशीत आढळून आलेले तथ्य | २५ |
| ६. | समितीचे निष्कर्ष | ३५ |
| ७. | शिफारशी | ३६ |
| ८. | आभार | ४० |

# प्रकरण १

## प्रस्तावना

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाची मौजे गोंदेदुमाला आणि वाडिवरे, ता. इगतपुरी, जिल्हा नाशिक येथील अधिग्रहीत जमीन गैर अधिसूचीत करण्याच्या मा. श्री. सुभाष देसाई, मंत्री (उद्योग, खनीकर्म) यांनी घेतलेल्या निर्णयाबाबत विधान सभा व विधान परिषद सदस्यांनी विधी मंडळाच्या दोन्ही सभागृहात उपस्थित केलेल्या आरोपांची चौकशी करण्याचे मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांनी आश्वासन दिले होते.

मा. मुख्यमंत्री महोदयांनी दिलेल्या सदर आश्वासनाच्या अनुषंगाने चौकशी करण्यासाठी शासनाने निर्णय घेतला आणि त्याप्रमाणे सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.एमआयएन-२२१७/प्र.क्र.११८/१७/२१ दिनांक २८.८.२०१७ रोजी निर्गमित करण्यात आला. या शासन निर्णयाप्रमाणे माझी एक सदस्यीय समिती नियुक्त करण्यात आली. या समितीचे कामकाज उपरोक्त शासन निर्णय निर्गमित झाल्यापासून दिनांक २० मार्च, २०१८ पर्यंत चालले.

उपरोक्त शासन निर्णयात नमूद केल्याप्रमाणे या समितीला संबंधित अधिकारी, कर्मचारी यांना चौकशीस बोलाविण्याचे अधिकार देण्यात आले होते. त्याचप्रमाणे उपरोक्त चौकशीच्या अनुषंगाने लागणारे संपूर्ण अभिलेख मागविण्याचे अधिकारही देण्यात आले. उद्योग, उर्जा व कामगार विभागाने तसेच महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने आवश्यक ती सर्व कागदपत्रे या समितीच्या मागणीप्रमाणे त्या त्या वेळी उपलब्ध करुन दिली. वरील शासन निर्णया प्रमाणे उद्योग, उर्जा व कामागार विभागाकडून एक सदस्यीय समितीसाठी कार्यालयीन जागा, कर्मचारीवृंद आणि इतर साहित्य व अनुषंगीक बाबी उपलब्ध करुन देण्याचे आदेश देण्यात आले होते. तथापि, सदर चौकशीची गोपनियता राखण्यासाठी आणि सदर चौकशीचे स्वातंत्र्य राखण्यासाठी या समितीने स्वतंत्र कर्मचारीवृंद यांची सेवा प्राप्त करुन घेतली.

# प्रकरण २

## समितीची संरचना व कार्यकक्षा

या एक सदस्यीय समितीची नियुक्ती उपरोक्त शासन निर्णयाप्रमाणे झालेली आहे आणि त्याची माहिती खंड ३/२ च्या पृष्ठ क्र. ५ वर ठेवण्यात आलेली आहे.

सदर चौकशीची कार्यकक्षा खालील प्रमाणे आहे :-

१) प्रश्नाधीन औद्योगिक क्षेत्रातील जमीन गैर अधिसुचीत करण्याचा निर्णय घेण्यापूर्वी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांनी मागील १५ वर्षात अन्य औद्योगिक क्षेत्रात व प्रश्नाधीन औद्योगिक क्षेत्रात गैर अधिसूचित करण्याचा निर्णय घेतला आहे का?

२) उक्त क्षेत्र गैर अधिसूचीत करताना महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या अधिनियम अथवा महामंडळाच्या जमीन विषयक अधिनियम/नियम/मार्गदर्शक तत्वे यांच्यानुसार गैरअधिसूचीत करण्यात आले आहे का?

३) उक्त क्षेत्र गैर अधिसूचीत प्रकरणी Conflict of Interest निदर्शनास येतो का?

४) उक्त प्रकरणांच्या अनुषंगाने अन्य इतर महत्वाच्या त्रुटी/उणीवा निदर्शनास येतात का?

# प्रकरण ३

## समितीने स्वीकारलेली कार्यप्रणाली

समितीने निष्पक्ष आणि सखोल चौकशी करण्याकरिता खालील कार्यपध्दती अवलंबिली :-

(अ) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांसह सर्व संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांची प्राथमिक बैठक घेऊन या चौकशीच्या कामाची व्याप्ती काय हे समजावून देण्यात आले. बैठकीमध्ये महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या चौकशीसाठी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ अधिनियम १९६१ आणि या अधिनियमा अंतर्गत तयार करण्यात आलेले नियम इत्यादींबाबत सखोल चर्चा करण्यात आली. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने अधिनियम अंमलात आल्यापासून औद्योगिक क्षेत्र अधिसूचीत करण्यासाठी कोणकोणत्या कलमांचा वापर केला. त्याचप्रमाणे जमीनी गैर अधिसूचीत करण्यासाठी त्या कायद्यामधील कोणकोणत्या तरतूदी विचारात घेऊन कार्यवाही केली. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या संचालक मंडळाच्या अधिकार क्षेत्रात काय काय बाबी येतात आणि त्याचप्रमाणे संचालक मंडळाचे अधिकार काय एवं शासनाने नियुक्त केलेल्या उच्च स्तरीय समितीला कोणकोणते अधिकार प्रदान केले गेले, याची चर्चा करण्यात आली. उच्च स्तरीय समितीने काय निर्णय घेतले किंवा काय शिफारशी केल्या आणि त्या शिफारशी संचालक मंडळावर किंवा महामंडळाच्या अध्यक्षांवर बंधनकारक आहेत किंवा नाहीत याचा उहापोह करण्यात आला. जर संचालक मंडळाच्या अध्यक्षांने उच्च स्तरीय समितीच्या शिफारशींच्या विरोधी निर्णय घेतला तर तो त्यांच्या अधिकार क्षेत्रात आहे किंवा नाही याचाही उहापोह करण्यात आला. उच्च स्तरीय समितीची बैठक बोलावण्याची प्रक्रिया काय आणि या बैठकीला कोरम किती असला पाहिजे. तसेच या बैठकीची सूचना किती दिवस अगोदर दिली पाहिजे, या बैठकीत चर्चेला येणारे विषय याची कार्यसूची किती दिवस अगोदर उच्च स्तरीय समितीच्या सदस्यांना मिळाली पाहिजे आणि उच्च स्तरीय समितीमध्ये विरोधी मत (dissent note) नोंदविणे हा अधिकार सदस्यांना अबाधित आहे किंवा नाही. या समितीचे इतिवृत्त (proceedings) सविस्तरपणे लिहिले जातात किंवा नाही, या प्रत्येक बाबीवर सविस्तर चर्चा करुन माहिती प्राप्त करुन घेण्यात आली.

वरील बैठकीच्या वेळी समितीच्या कामकाजाच्या सुलभतेसाठी एक वरिष्ठ अधिकारी केंद्रस्थ अधिकारी (Nodal Officer) नियुक्त करण्यात यावा अशी विनंती केली. त्यानुसार मुख्य कार्यकारी

अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांनी श्री. विक्रम कुमार, सह मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांची केंद्रस्थ अधिकारी (Nodal Officer) म्हणून नियुक्ती केली . त्यांचे आदेश खंड ३/३ च्या पृष्ठ क्र. १३ वर आहेत.

(ब) वरील माहितीच्या आधारावर समितीने एका "एक्सेल तक्त्यामध्ये" (Excel Sheet) मध्ये माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी मसुदा तक्ता (Proforma) तयार केला आणि संबंधीत अधिकारी आणि मंत्री यांना अत्यंत सोप्या मार्गाने प्रत्येक विषयाबाबत माहिती उपलब्ध करुन देता येईल याची काळजी घेतली. या प्रोफार्मामध्ये जी माहिती महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून पाहिजे होती ते रिकामे क्षेत्र (blocks or cells) त्यांच्यासाठी खुले (open) होते आणि इतर जे तपशील (details) तक्त्यामध्ये (proforma) होते ते गोठवण्यात (freez) आले. असे केल्याने महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या अधिकाऱ्यांना माहिती देणे अत्यंत सोपे झाले आणि त्यांनी माहिती उपलब्ध करुन दिली. या प्रोफार्मामध्ये वित्तिय वर्ष, नस्ती क्र. विना अधिसूचीत केलेल्या जमीनीचे क्षेत्र, तसेच हे प्रकरण व संबंधित नस्ती कनिष्ठतम कर्मचाऱ्यापासून ते वरिष्ठतम अधिकारी, यापैकी कोणी कोणी हाताळली आहे, त्यांचा कार्यकाल काय होता? नस्तीमधील मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या नियंत्रणाखालील यंत्रणेपासून मुख्य कार्यकारी अधिकारीपर्यंतच्या एकंदर शिफारशी, तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांनी स्वत: (असल्यास) दिलेले अभिप्राय आणि शिफारशी, त्याचप्रमाणे केंद्रस्थ अधिकारी (Nodal Officer) यांची सही आणि मुख्य कार्यकारी अधिकारी यांची सही अशा बाबींचा समावेश करण्यात आला.

हे तक्ते (प्रोफॉर्मा) ईमेल द्वारे केंद्रस्थ अधिकारी यांच्याकडे पाठविण्यात आले. प्रकरणांचा कालावधी, शासन निर्णय निर्गमित झाल्याच्या तारखेपासून म्हणजेच २८.८.२०१७ पासून मागील १५ वर्षे अर्थात २८.८.२००२ पर्यंतच्या कालावधीत अशा किती प्रकरणांमध्ये अधिसूचीत जमीनी गैर अधिसूचीत करण्यात आल्या याची माहिती गोळा करण्याचे निर्देश देण्यात आले आणि निर्देशाप्रमाणे केंद्रस्थ अधिकारी (Nodal Officer) यांनी १६० प्रकरणांमध्ये जमीनी गैर अधिसूचीत केल्या ही संख्या समितीला उपलब्ध करुन दिली.

(क) गेल्या १५ वर्षांमध्ये विना अधिसूचीत करण्याची प्रकरणे १६० इतकी जास्त असल्यामुळे जसजसे केंद्रस्थ अधिकाऱ्याकडून (नोडल ऑफिसरांकडून) प्रोफॉर्मामध्ये माहिती प्राप्त होत गेली, तसतसे त्या प्रकरणांची मुळ नस्ती पाहून सखोल चौकशीचे काम सुरु करण्यात आले. वेळेअभावी

काही प्रकरणांमध्ये संबंधित अधिकारी/कर्मचारी, ज्यांनी हे प्रकरण हाताळले होते त्यांची नावे आणि त्यांचा कार्यकाळ उपलब्ध होऊ शकला नाही. केंद्रस्थ अधिकाऱ्याने प्रयत्न करुनही, ते काही अधिकारी / कर्मचाऱ्यांची नांवे समितीला देऊ शकले नाहीत. तथापि, ही माहिती शाश्वत असल्यामुळे शासनाला कधीही महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या संबंधीत कर्मचारी /अधिकारी यांच्या बाबतची कार्यकाळाची आणि नस्ती हाताळण्याबाबतची माहिती प्राप्त करुन घेता येईल, त्यामुळे समितीने आपले कामकाज थांबविले नाही. एकंदर १६० प्रकरणांमध्ये महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ/शासनाने कोणत्या जमिनी विना अधिसूचीत करण्याचा अंतिम निर्णय घेतला. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाची माहिती आणि मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांपर्यंतचे अभिप्राय हे प्रोफॉर्मा (भाग १-1-मऔविम) अनुषंगाने उपलब्ध आहेत.

(ड) प्रोफॉर्मा (Prapatra 2): वरील माहितीच्या आधारावर समितीने एका दुसऱ्या Excel Sheet मध्ये माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी तक्ता (Proforma) तयार केला आणि संबंधीत सचिव आणि मंत्री यांना अत्यंत सोप्या मार्गाने प्रत्येक प्रकरणाच्या बाबतीत माहिती उपलब्ध करुन देता येईल याची काळजी घेतली. या प्रोफार्मामध्ये जी माहिती शासनाच्या उद्योग विभागाकडून पाहिजे होती ते रिकामे क्षेत्र ( blocks or cells) त्यांच्यासाठी खुले (open) होते आणि इतर जे तपशील (details ) तक्त्यामध्ये (proforma) होते ते गोठवण्यात (freez) आले. असे केल्याने उद्योग विभागाच्या अधिकाऱ्यांना माहिती देणे अत्यंत सोपे झाले आणि त्यांनी माहिती उपलब्ध करुन दिली. या प्रोफार्मामध्ये वित्तिय वर्ष, नस्ती क्र., विना अधिसूचीत केलेल्या जमीनीचे क्षेत्र, तसेच हे प्रकरण उद्योग विभागामध्ये कनिष्ठतम कर्मचाऱ्यापासून ते वरिष्ठतम अधिकाऱ्यांपर्यंत कोणाकोणाकडून हाताळले गेले, ही माहिती आहे. त्यांचा कार्यकाल, नस्तीमधील अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव यांच्यासह त्यांच्या नियंत्रणाखालील यंत्रणेपासूनचा एकंदर शिफारशी त्याच्यावर अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव यांनी स्वत: (असल्यास) दिलेले अभिप्राय आणि शिफारशी, त्याचप्रमाणे शासनाचे केंद्रस्थ अधिकारी (Nodal Officer) यांची सही आणि अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव यांची सही अशा बाबींचा समावेश करण्यात आला.

(इ) हे प्रोफॉर्मा ईमेल द्वारे शासनाच्या केंद्रस्थ अधिकारी (Nodal Officer) यांच्याकडे पाठविण्यात आले. प्रकरणांचा कालावधी, शासन निर्णय निर्गमित झाल्याच्या तारखेपासून म्हणजेच २८.८.२०१७ पासून मागील १५ वर्षे अर्थात २८.८.२००२ पर्यंतच्या कालावधीत अशा किती प्रकरणांमध्ये जमीनी गैर अधिसूचीत करण्यासाठी अंतिम निर्णय घेण्यात आले ही माहिती गोळा करण्याचे निर्देश देण्यात आले

आणि निर्देशाप्रमाणे केंद्रस्थ अधिकारी यांनी १६० प्रकरणांमध्ये जमीनी गैर अधिसूचीत केल्या, ही संख्या समितीला उपलब्ध करुन दिली.

(ई) गेल्या १५ वर्षामध्ये गैर अधिसूचीत करण्याची प्रकरणे १६० इतकी जास्त असल्यामुळे जसजसे विभागाच्या केंद्रस्थ अधिकाऱ्याकडून प्रोफॉर्मामध्ये माहिती प्राप्त होत गेली तसतसे त्या प्रकरणांची विभागातील नस्तीत उपलब्ध माहिती प्रमाणे सखोल चौकशीचे काम सुरु करण्यात आले. वेळे अभावी, काही प्रकरणांमध्ये विभागातील संबंधित अधिकारी/कर्मचारी ज्यांनी हे प्रकरण हाताळले होते त्यांची नावे आणि त्यांचा कार्यकाळ उपलब्ध होऊ शकला नाही. केंद्रस्थ अधिकारी (नोडल ऑफिसर) हे प्रयत्न करुनही काही अधिकारी / कर्मचाऱ्यांची नांवे समितीला देऊ शकले नाहीत. तथापि, ही माहिती शाश्वत असल्यामुळे शासनाला कधीही उद्योग विभागाशी संबंधीत कर्मचारी /अधिकारी यांच्या बाबतची कार्यकाळाची आणि नस्ती हाताळण्याबाबतची माहिती प्राप्त करुन घेता येईल, त्यामुळे समितीने आपले कामकाज थांबविले नाही. एकंदर १६० प्रकरणांध्ये उद्योग विभागाने जमीनी गैर अधिसूचीत करण्याचा अंतिम निर्णय घेतला. अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिवसह त्यांच्या नियंत्रणाखालील अधिकाऱ्यांपर्यंतचे अभिप्राय हे प्रोफॉर्मा (भाग १-1-मऔविम) च्या अनुषंगाने उपलब्ध आहेत.

**महाराष्ट्र औद्योगिक औद्योगिक विकास अधिनियम १९६१ अंतर्गत भूसंपादन कार्यवाहीसाठी व जमीनीच्या नुकसान भरपाईचा दर ठरविण्यासाठी समितीची नियुक्ती**

उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाने त्यांचा शासन निर्णय क्र. आयडीसी १८९३/२६२(१)/उद्योग १४ दि. ११.७.१९९४ प्रमाणे काही विशिष्ट प्रकरणी जमीनीचा मोबदला सूपूर्द केलेल्या अधिकारापेक्षा जास्त होत असेल तर अशा प्रकरणांमध्ये नुकसान भरपाई ठरविण्यासाठी समितीची नियुक्ती केली. यामध्ये सचिव (उद्योग), अध्यक्ष असून सह सचिव, उद्योग विभाग, मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, संचालक (नगरविकास), पुणे इत्यादी सदस्य आहेत.

तत्पूर्वी शासन निर्णय क्र. आयडीसी १८९३/(२६२)/उद्योग १४ दिनांक १४.५.१९९३ रोजी शासन निर्णय निर्गमित करुन महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम १९६१ च्या कलम ३२, ३३(२), ३६, ३८ अन्वये वाटाघाटीने भूसंपादन करताना प्रती हेक्टरी रु.५०,००० पर्यंत नुकसान भरपाई दर ठरविण्याचे अधिकार राज्यातील सर्व जिल्हाधिकाऱ्यांना दिला, तसेच प्रती हेक्टरी रु.५०,००१ ते १ लाखापर्यंत नुकसान भरपाई दर ठरविण्याचा अधिकार राज्यातील सर्व विभागीय आयुक्तांना प्रदान करण्यात आला. ज्या प्रकरणांमध्ये वाटाघाटीने प्रती हेक्टरी येणारी किंमत रु १ लाखपेक्षा जास्त असेल अशी प्रकरणे

शासनाच्या उद्योग विभागाकडे मान्यतेसाठी पाठविण्याचे निर्देश देण्यात आले. त्यावेळी असाही उल्लेख शासन निर्णयामध्ये केला आहे की, सदर अधिकाराच्या प्रदानाबाबत महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम १९६१ च्या नियम २८ मध्ये योग्य ते बदल लवकरच करण्यात येणार आहेत. **तथापि आजपर्यंत महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम १९६१ च्या नियम क्र.२८ मध्ये योग्य तो बदल करण्यात आलेला नाही. ही गंभीर बाब समितीच्या निदर्शनास आली.** म्हणजेच महाराष्ट्र औद्योगिक विकास नियम १९६२ च्या नियम २८ मध्ये कुठल्याही प्रकारचा बदल न करता शासन निर्णयाच्या स्वरुपामध्ये पुढील कार्यवाही होत गेली. नंतर शासन निर्णय क्र. आयडीसी १८९५/(२४६२)/उद्योग १४ दिनांक ५ जुलै १९९६ रोजी महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम १९६१ अंतर्गत भूसंपादन कार्यवाहीसाठी व जमीनींच्या नुकसान भरपाईचे दर ठरविण्यासाठी समितीला नव्याने अधिकार वाढवून देण्यात आले. या शासन निर्णयामध्ये महाराष्ट्र राज्याची औद्योगिक भूमिका ठरवणारे धोरण दि. १२ एप्रिल १९९३ रोजी जाहीर करण्यात आल्याचे उल्लेखित आहे. या शासन निर्णयाप्रमाणे सचिव (उद्योग) यांच्या अध्यक्षतेखाली इतर दहा सदस्यांची, ज्यामध्ये मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ सदस्य सचिव आहेत, अशी एक नवीन समिती नियुक्त करण्यात आली. महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम १९६१ च्या कलम १ पोटनियम ३ अन्वये प्राथमिक अधिसूचना निर्गमित करुन शासनाचा भूसंपादनाचा हेतू जाहीर करण्यासाठी प्राथमिक छाननी व तत्संबंधी मंजुरी देण्याचे अधिकार सदर समितीस प्रदान करण्यात आले. तथापि, महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम १९६१ च्या कलम १ पोटनियम ३ अन्वये प्राथमिक अधिसूचना निर्गमित केल्यानंतर, महाराष्ट्र औद्योगिक विकास नियम १९६२ च्या नियम ३० अन्वये गैर अधिसूचीत करण्याबाबतचा उल्लेख दिनांक ५.७.१९९६ च्या शासन निर्णयामध्ये केला नाही. थोडक्यात दिनांक ५.७.१९९६ च्या शासन निर्णयामध्ये कलम १(३) अन्वये प्राथमिक छाननी व तत्संबंधी मंजूरी देण्याचे अधिकार समितीस दिले. परंतु महाराष्ट्र औद्योगिक विकास नियम १९६२ च्या नियम ३० प्रमाणे जमीनी विना अधिसूचीत करण्याचा अधिकार विभागाने आपल्याकडे राखून ठेवला. एका बाजूला महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम १९६१ च्या कलम १(३) प्रमाणे जमीनी अधिसूचित करण्याचाही अधिकार समितीस दिला, परंतु दूस-या बाजूला जमीनी विना अधिसूचीत करण्याचाही अधिकार उपरोक्त समितीला न देता उद्योग विभागाने आपल्याकडेच राखून ठेवला. एवढेच नव्हे तर उद्योग विभागाने महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम कलम १(३) प्रमाणे वेळोवेळी अधिसूचना जाहीर करताना गट नंबर आणि त्या त्या गटाचे

क्षेत्रही दाखविले परंतु ही अधिसूचना कोणत्या कालावधीपर्यंत विना अधिसूचीत करता येईल याचा उल्लेख त्या त्या वेळी शासनाच्या राजपत्रात केला नाही.

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या अधिकाऱ्यांना दि. २ नोव्हेंबर २०१७ च्या बैठकीत याबाबत विचारणा केल्यानंतर त्यांनी असे मत व्यक्त केले की ज्याअर्थी महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनयिम १९६१ च्या कलम १ पोटकलम ३ चा उल्लेख अधिसूचनेत केलेला आहे त्याअर्थी प्रत्येक गटासमोर विना अधिसूचित करण्यासाठी कालमर्यादा काय हे उल्लेखीत करणे आवश्यक नाही. समज (presumption) असा आहे की प्रत्येक जमीन मालकाने, ही अधिसूचना पाहिल्यानंतर कलम १ पोटकलम ३ प्रमाणे कोणत्या तारखेपर्यंत त्याची स्वत:ची जमीन विनाअधिसूचीत करुन घेऊ शकेल याचा, स्वत: गणित व आपापला अभ्यास करुन आपली कार्यवाही करावी. ही बाब पारदर्शकतेला धरुन नाही. सर्व जमीन मालक सुशिक्षीत, बहुश्रूत व जाणकार (well informed) असतीलच अशी धारणा बाळगणे योग्य नाही. Although 'Ignorance of Law is No Excuse' हे तत्त्व न्यायव्यवस्थेने ठरवून दिले आहे, तथापि व्यावहारिक दृष्टिकोनातून प्रत्येक गटासमोर गैरसूचीत करण्यासाठी शेवटची तारीख नमूद केलेली असती तर संभाव्य गैरप्रकार किंवा मंत्रालयातील/म.औ.वि.म. च्या खेटा/चकरा मारण्याची व उच्च पदस्थांना विनंती करण्याची पाळी आली नसती.

'Ignorance of Law is No Excuse' हे जरी खरे असले तरी महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम १९६१ च्या कलम १ पोटकलम ३ च्या शासन राजपत्रातील अधिसूचनेमध्ये कोणत्या कालावधीपर्यंत अधिसूचीत जमीन विना अधिसूचीत करुन घेता येईल हा कालावधी प्रसिध्द करणे आवश्यक आहे असे या समितीस प्रांजळपणे वाटते. असे केल्यास जमीन मालकाला त्याच्या हक्काची जाणीव राहील आणि तो इतर आक्षेपार्ह (objectionable) गैरमार्गाने त्याची जमीन विना अधिसूचित करण्यासाठी शासनाकडे प्रयत्न करणार नाही म्हणजे असे प्रसंग भविष्य काळात उदभवणार नाहीत.

महाराष्ट्र औद्योगिक विकास नियम, १९६२ मध्ये शासन अधिसूचना ४.२.१९७७ प्रमाणे नियम ३० दाखल (insert) करण्यात आला. नियम ३० प्रमाणे महाराष्ट्र औद्योगिक विकास १९६१ च्या कलम १ (पोटकलम ३) च्या दुसऱ्या परंतुकामध्ये जमीन किती कालावधीनंतर विना अधिसूचीत करता येणार नाही याची तरतूद करण्यात आली. जी जमीन महाराष्ट्र औद्योगिक विकास (सुधारणा) अधिनियम १९७४ (महाराष्ट्र XVIII ऑफ १९७५) जी १५.९.१९७६ रोजी प्रसिध्द करण्यात आली, त्या जमीनीच्या पूर्वीच्या अधिसूचनेपासून म्हणजेच प्रकरण ६ लागल्यापासून २० वर्षाचा कालावधी ठेवण्यात आला आणि जी जमीन उपरोक्त सुधारणा अधिनियमाच्या नंतर अधिसूचीत करण्यात आली होती, त्या

जमीनीच्या अधिसूचनेपासून म्हणजेच प्रकरण ६ लागू झाल्यापासून १० वर्षाचा कालावधी देण्यात आला. याचा अर्थ असा की, १५.९.१९७६ च्या पूर्वीच्या अधिसूचीत औद्योगिक क्षेत्राला १४.९.१९९६ नंतर कुठल्याही परिस्थितीत विना अधिसूचित करण्याचा अधिकार नव्हता. त्याचप्रमाणे १५.९.१९७६ नंतर अधिसूचीत झालेले औद्योगिक क्षेत्र प्रकरण ६ लागू झाल्यानंतर १० वर्षांचा कालावधी संपल्यावर विना अधिसूचीत करणे बेकायदेशीर ठरविण्यात आले होते किंवा विना अधिसूचीत करण्यावर बंदी घातली होती. महाराष्ट्र औद्योगिक विकास नियम, १९६२ मधील नियम ३० ची तरतूद २००९ मध्ये सुधारित करण्यात आली. दिनांक ८.६.२००९ चा महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग ४ ब मध्ये सुधारणा करण्यात आली. (पृष्ठ क्र.१८ व १९).

या अधिसूचनेप्रमाणे महाराष्ट्र औद्योगिक विकास नियम १९६२ मधील ३० मध्ये (अ) परि. १ मध्ये नमुद क्रमांक व शब्द यामध्ये "२० वर्षे" याऐवजी "४० वर्षे" असा बदल करण्यात आला आणि (ब) परि.२ मध्ये नमूद क्र. व शब्द यामध्ये "१० वर्षे" याऐवजी "३५ वर्षे" असा बदल करण्यात आला.

वरील विश्लेषणावरुन असे स्पष्ट होईल की १५.९.१९७६ पासून ८.६.२००९ पर्यंतच्या कालावधीसाठी, १५.९.१९७६ पूर्वी अधिसूचीत झालेले औद्योगिक क्षेत्र विना अधिसूचीत करण्यासाठी कमाल मर्यादा २० वर्षाची ठेवली आणि १५.९.१९७६ नंतर अधिसूचीत झालेल्या औद्योगिक क्षेत्राच्या प्रकरणामध्ये कमाल मर्यादा १० वर्षाची ठेवली.

तसेच ८.६.२००९ च्या सुधारणेप्रमाणे १५.९.१९७६ च्या पूर्वी अधिसूचीत झालेले औद्योगिक क्षेत्र विना अधिसूचीत करण्यासाठी ४० वर्षांची कमाल मर्यादा घालण्यात आली आणि १५.९.१९७६ नंतर अधिसूचीत करण्यात आलेल्या औद्योगिक क्षेत्राला विना अधिसूचीत करण्यासाठी ३५ वर्षांची कमाल मर्यादा घालण्यात आली.

उदाहरण म्हणून सांगायचे झाले तर, एखादे औद्योगिक क्षेत्र जर दि. १४.९.१९७६ ला अधिसूचीत झाले असेल तर १४.९.२०१६ नंतर ते औद्योगिक क्षेत्र विना अधिसूचीत करणे नियमबाह्य ठरेल अशी तरतूद करण्यात आली.

तसेच दुसरे उदाहरण म्हणजे एखादे औद्योगिक क्षेत्र जर १६.९.१९७६ ला अधिसूचीत झाले असेल तर १६.९.२०११ नंतर ते औद्योगिक क्षेत्र विना अधिसूचीत करणे नियमबाह्य ठरेल अशी तरतूद करण्यात आली.

वरील सर्व विवेचनांवरुन असे स्पष्टपणे दिसून येईल की, कोणतेही औद्योगिक क्षेत्र जे महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम १९६१ च्या कलम १(३) प्रमाणे अधिसूचीत करण्यात आले असेल, त्या

औद्योगिक क्षेत्राला विना अधिसूचीत करण्यासाठी अभिप्राय देताना किंवा शिफारस करताना महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या सह त्यांच्या नियंत्रणाखालील यंत्रणेने त्यांच्या त्यांच्या टिप्पणींमध्ये जमीन अधिसूचीत केलेल्या तारखेचा उल्लेख करणे व कोणत्या तारखेपर्यंत गैरअधिसूचीत करता येईल याचा उल्लेख करणे अत्यंत आवश्यक आहे.

जेंव्हा असे प्रकरण शासनाच्या स्तरावर हाताळले जाते तेव्हासुध्दा उद्योग विभागातील अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव यांच्यासह विभागातील त्यांच्या नियंत्रणाखालील अधिकाऱ्याने कोणत्या तारखेला ते औद्योगिक क्षेत्र अधिसूचीत करण्यात आले होते आणि कोणत्या तारखेपर्यंत ते औद्योगिक क्षेत्र विना अधिसूचीत करता येते याचा उल्लेख त्यांच्या त्यांच्या टिप्पणीमध्ये करणे आवश्यक आहे.

समितीने ज्या वेळी (दिनांक २.११.२०१७ रोजी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या अंधेरी येथील त्यांच्या कार्यालयात) केंद्रस्थ अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ व सर्व संबंधित अधिकाऱ्यांची बैठक घेतली आणि याबद्दल विचारणा केली तेव्हा असे दिसून आले की, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या कुठल्याही नस्ती मधील अधिकाऱ्यांच्या टिप्पणी मध्ये जमीन गैरअधिसूचीत करण्याकरिता अंतिम तारीख कोणती, याचाउल्लेख नसतो.

तसेच समितीने ज्यावेळी शासनाच्या स्तरावर उद्योग विभागाने नेमून दिलेले नोडल ऑफिसर यांची साक्ष घेतली आणि विचारणा केली तर उद्योग विभागाच्या संबंधित अधिकाऱ्यांच्या टिप्पणीमध्येही औद्योगिक क्षेत्र केंव्हापर्यंत  गैरअधिसूचीत करता येईल, या तारखेचा  उल्लेख केला नाही असे दिसून आले. ही चूक गंभीर स्वरुपाची  आणि दूरगामी अनिष्ट परिणाम करणारी चूक आहे. कारण टिप्पणी मध्ये जर कोणत्या तारखेपर्यंत विना अधिसूचीत करता येईल आणि कोणत्या तारखेनंतर विना अधिसूचीत करता येणार नाही याची कल्पना सक्षम प्राधिकाऱ्याला दिली नाही तर सक्षम प्राधिकाऱ्याला सहज लक्षात येणार नाही. तसेच सक्षम प्राधिकाऱ्याकडून अशी अपेक्षाही करणे योग्य नाही.  कारण त्यांच्यावर अनेक कामांचा ताण, कमी वेळ, काही वेळा त्यांच्या खाजगी सचिवांची अपरिपक्वता किंवा हितसंबंध सुध्दा या बाबतीत कारणीभूत होऊ शकतात.  सर्व उच्चपदस्थ प्रामाणिकपणे व अत्यंत बारकाईने अभ्यास करुन प्रत्येक नस्तीवर निर्णय घेतील ही अपेक्षा योग्यच आहे तथापि काही प्रसंगी असे होत नाही ही बाब खेदाची आहे असे समितीला वाटते. विभागाने किंवा अधिकाऱ्याने दिलेल्या imperfect सल्ल्याचा गैरफायदा घेण्यास काही व्यक्ति पुढेमागे पाहणार नाहीत, किंबहुना उत्सुक राहतील.  ही जाणीव ठेवून सल्ला देताना अत्यंत संतुलित, नियमानुकुल, व्यावहारिक व योग्य सल्ला

दिला पाहिजे असे समितीचे प्रांजळ मत आहे. आणि सक्षम प्राधिकारी यांनी जर जागरुकता ठेवली नाही आणि प्रश्न उपस्थित केले नाहीत तर बेकायदेशीररित्या सुध्दा औद्योगिक क्षेत्र विना अधिसूचीत होत राहतील.

**समितीचे संक्षिप्त मत याबाबत खालीलप्रमाणे आहे.**

१. दिनांक ५.७.१९९६ च्या शासन निर्णयामध्ये ज्याप्रमाणे महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम १९६१ च्या कलम १ पोटकलम ३ अन्वये करण्याची प्राथमिक अधिसूचना निर्गमित करुन, शासनाच्या भूसंपादनाचा हेतू जाहीर करण्यासाठी, प्राथमिक छाननी आणि तत्संबंधीची मंजूरी देण्याचे अधिकार उच्चाधिकार समितीस प्रदान करण्यात आले, त्याचप्रमाणे महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम कलम १पोटकलम च्या ३ 'दुसऱ्या परंतुकाप्रमाणे' ते औद्योगिक क्षेत्र विना अधिसूचीत करणे योग्य ठरेल किंवा नाही याचीही प्राथमिक छाननी व मंजूरी किंवा शिफारस करण्याचे अधिकार सदर समितीस दिले पाहिजेत. अधिसूचीत करण्यासाठी प्राथमिक छाननी समितीस देणे आणि विनाअधिसूचीत करण्याचे अधिकार उद्योग विभागाच्या अधिकाऱ्यांवर सोडून देणे, हे तर्कसंगत वाटत नाही.

२. औद्योगिक क्षेत्र विना अधिसूचीत करण्याचे प्रकरण हाताळताना कोणत्या तारखेला औद्योगिक क्षेत्र महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम १९६१ च्या कलम १ पोटकलम ३ अन्वये अधिसूचित करण्यात आले व कोणत्या तारखेपर्यंत विना अधिसूचीत करता येईल त्या तारखांचा उल्लेख महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या अधिकाऱ्यांनी तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी त्यांच्या अभिप्रायामध्ये <u>केलाच</u> पाहिजे.

३. त्याचप्रमाणे विभागाच्या स्तरावर, औद्योगिक क्षेत्र विना अधिसूचीत करण्याचे प्रकरण हाताळणाऱ्याने कोणत्या तारखेला औद्योगिक क्षेत्र महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम १९६१ च्या कलम १ पोटकलम ३ अन्वये अधिसूचित करण्यात आले व कोणत्या तारखेपर्यंत विना अधिसूचीत करता येते, त्या तारखांचा उल्लेख उद्योग विभागाच्या संबंधित अधिकाऱ्यांनी तसेच अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, यांनी त्यांच्या अभिप्रायामध्ये <u>केलाच</u> पाहिजे.

४. सक्षम प्राधिकाऱ्याने औद्योगिक क्षेत्र विना अधिसूचीत करण्याचा कालावधी उरलेला आहे की नाही ही खात्री <u>केलीच</u> पाहिजे. वरील सर्व १ ते ३ करण्यासाठी आणि ते सोपे करण्यासाठी जर महाराष्ट्र शासन राजपत्रामध्ये जादा रकाना टाकून कोणत्या तारखेनंतर विना अधिसूचीत करता येणार नाही याचा उल्लेख केला तर अशा प्रकारच्या चुका किंवा हेतूपुरस्सर कार्यवाही होण्याची शक्यता कमी राहील.

५. उपरोक्त प्रमाणे ज्या उणिवा समितीस दिसून आल्या त्या उणिवा हेतूपूरस्सर किंवा जाणीवपूर्वक राहू दिल्या गेल्या असे समितीचे मत नाही. तथापि, या उणिवा आहेत आणि त्यासाठी काय काळजी घेतली पाहिजे हे १५.९.१९७६ नंतर, व चौकशीचे आदेश होईपर्यंतच्या कालावधीत कोणाच्याही लक्षात आले नाही हीसुध्दा आश्चर्यजनक बाब आहे. शासनाने कृपया याची दखल घ्यावी.

६. दिनांक ५ मे १९८२ रोजी श्री. एस.पी. मोहोनी, सचिव (उद्योग) यांच्या सहीने श्री.डी.डी. अष्टपुत्रे, महासंचालक (समन्वय) आणि के. एल.एन. दोषी तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांच्या सल्ल्याने महाराष्ट्र औद्योगिक विकास जमीन संहिता निर्गमित केली. त्या संहितेच्या मॅन्युअलचा भाग १ च्या परिच्छेद ३ प्रमाणे महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या महत्त्वाच्या कार्यांमध्ये, क्षेत्र निश्चित करुन औद्योगिक क्षेत्राची मांडणी करणे, भूसंपादन क्षेत्र प्रस्तावित करणे, इत्यादी बाबींचा उल्लेख करण्यात आलेला आहे. परिच्छेद ४ मध्ये असा उल्लेख करण्यात आलेला आहे की, ही सर्व कामे करण्यासाठी विविध प्रकारची पावले उचलण्यासाठी या संहितेची निर्मिती करण्यात आलेली आहे.

प्रकरण १ च्या कमिटी फॉर सिलेक्शन ऑफ साईटस परि. १(२) प्रमाणे उप मुख्य कार्यकारी अधिकारी, मुख्य शहर नगररचनाकार, वास्तुविशारद आणि शाखा अभियंता (संकल्पचित्र), महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांची एक समिती निर्माण करण्यात आली. या समितीला विविध प्रकारचे अभ्यास करुन क्षेत्र (साईटस्) निवडण्याचे काम देण्यात आले. निवड करतेवेळी क्षेत्रीय (साईट) भेट करणे किंवा एखाद्या अधिकाऱ्याला क्षेत्रीय (साईट) भेट देऊन त्याचा अहवाल देणे याचा उल्लेख करण्यात आलेला नाही. म्हणजेच क्षेत्रीय (साईट) भेट करावी किंवा कसे याबद्दल स्पष्ट उल्लेख समितीला मिळू शकले नाहीत.

दिनांक २.११.२०१७ रोजी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या अंधेरी येथील कार्यालयात महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या अधिकाऱ्यांशी ज्यावेळी या विषयावर चर्चा करण्यात आली त्यावेळी महामंडळाच्या अधिकाऱ्यांनी असे सांगितले की, क्षेत्रीय (साईट) भेट देण्याची पध्दत आहे व क्षेत्रीय भेटीचा अहवाल सुध्दा शासनाच्या उच्चाधिकार समितीकडे पाठविला जातो.

समितीच्या असे निर्दशनास आले की काही प्रकरणांमध्ये अधिसूचित औद्योगिक क्षेत्रामध्ये गांवठाण आहे अशा सबबीखाली औद्योगिक क्षेत्र विना अधिसूचीत करण्याचा प्रस्ताव नंतर प्राप्त होत असतो. <u>जर क्षेत्रीय भेटीच्या अहवालामध्येच गावठाण आहे, असा उल्लेख झाला तर उच्चाधिकार समितीला जाणिवपूर्वक निर्णय घेता येईल की, महाराष्ट्र औद्योगिक विकास</u>

अधिनियम १९६१ च्या कलम १ पोटकलम ३ प्रमाणे औद्योगिक क्षेत्र अधिसूचीत करताना गांवठाण क्षेत्र वगळून करावे किंवा त्या गांवठाणाला इतर ठिकाणी पुर्नवसीत करण्याच्या अटीवर औद्योगिक क्षेत्र जाहीर करावे. अन्यथा औद्योगिक क्षेत्र अधिसूचीत झाल्यानंतर गांवठाण क्षेत्र वगळणे तसेच इतर अनुपयुक्त जागा वगळणे इत्यादी बाबतीत शासनाकडे प्रकरणे येत राहतील.

समितीचे असे मत आहे की, संपूर्ण प्रस्तावित औद्योगिक क्षेत्रामध्ये वैयक्तिक क्षेत्र भेट तर द्यावीच त्याचप्रमाणे प्रत्येक गटासमोर तेथे गांवठाण आहे, की शेत जमीन आहे की एखादी इमारत आहे की एखादी विहीर आहे की वृक्ष आहेत याचाही उल्लेख करणे बंधनकारक करावे, जेणेकरुन नंतरच्या कालावधीमध्ये अधिसूचीत केलेल्या औद्योगिक क्षेत्राच्या जमीनीपैकी विना अधिसूचीत करण्याची अनावश्यक व "avoidable" प्रकरणे शासनाकडे येणार नाहीत.

## प्रकरण ४

# महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ अधिनियम, नियम / शासन निर्णय, परिपत्रक, राजपत्र इत्यादीमधील महत्वाच्या तरतुदी

## महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, १९६१

### महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम कलम १ पोटकलम ३

(३) हा अधिनियम, त्याचें प्रकरण ६ खेरीज करुन, ताबडतोब अंमलात येईल; प्रकरण ६ हे राज्य शासन राजपत्रातील अधिसूचनेव्दारे त्याबाबतीत वेळोवेळी नेमून देईल त्या क्षेत्रात व त्या दिनांकापासून अंमलात येईल:

१[ परंतु, जर राज्य शासनाच्या मते जेथे प्रकरण सहा अंमलात आणले आहे अशा कोणत्याही क्षेत्राची किंवा त्याच्या कोणत्याही भागाची औद्योगिक क्षेत्र म्हणून विकसित करण्याच्या प्रयोजनासाठी, आवश्यकता नसेल किंवा आवश्यकता पडण्याचा संभव नसेल तर, राज्य शासनास, तत्सम अधिसूचनेव्दारे, अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा दिनांकास, अशा दिनांकाच्यापूर्वी केलेल्या किंवा करण्याचे वर्जिलेल्या गोष्टीबाबत असेल त्याव्यतिरिक्त, त्या क्षेत्रात किंवा त्याच्या कोणत्याही भागात प्रकरण सहा अंमलात असण्याचे बंद होईल, असा निदेश देता येईल :

परंतु आणखी असे की, प्रकरण सहा अंमलात आणल्याच्या दिनांकापासून विहित करण्यात येईल अशा कालावधीच्या समाप्तीनंतर राज्य शासनाकडून पहिल्या परंतुकाखाली कोणतीही अधिसूचना काढण्यात येणार नाही आणि महाराष्ट्र औद्योगिक विकास (सुधारणा) अधिनियम , १९७४ याच्या प्रारंभापूर्वी ज्यामध्ये प्रकरण सहा अंमलात आणले असेल अशी क्षेत्रे आणि अशा प्रारंभानंतर ज्यामध्ये प्रकरण सहा अंमलात आणले जाईल अशी क्षेत्रे यांसाठी वेगवेगळे कालावधी विहित करता येतील) १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १८

**कलम २ (ग)**

व्याख्या २. संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर, या अधिनियमात

(ग) "औद्योगिक क्षेत्र" याचा अर्थ, राज्य शासनाने **राजपत्रातील** अधिसूचनेव्दारे औद्योगिक क्षेत्र म्हणून जाहीर केलेल्या ज्या कोणत्याही क्षेत्राचा विकास करावयाचा असेल आणि ज्यात उद्योगधंद्यांना जागा द्यावयाची असेल असे कोणतेही क्षेत्र, असा आहे;

**कलम २ (क)**

(के) विहित केलेले याचा अर्थ, या अधिनियमान्वये केलेल्या नियमांव्दारे विहित केलेले, असा आहे.

**कलम १८**

१८. राज्य शासनास या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी धोरणासंबंधी त्यास आवश्यक किंवा इष्ट वाटतील असे धोरणविषयक सर्वसाधारण किंवा विशेष निदेश महामंडळास देता येतील आणि अशा निदेशांचे पालन करणे आणि त्याप्रमाणे कार्य करणे ही गोष्ट महामंडळावर बंधनकारक असेल.

**कलम ३१**

**प्रकरण सहा**

**जमीन संपादन करणे व तिचा विनियोग करणे**

३१. या प्रकरणाच्या तरतुदी या राज्य शासनाकडून कलम १, पोट कलम (३) अन्वये अधिसूचित करण्यात येईल अशा क्षेत्रास व त्या दिनांकापासून लागू होतील.

---

**कलम ३२(१)**

३२(१) एखादी जमीन महामंडळाकडून विकसित केली जाण्यासाठी किंवा या अधिनियमाची उद्दिष्टये साध्य करण्याच्या संबंधातील इतर कोणत्याही प्रयोजनासाठी आवश्यक असेल तर राज्य शासनाला राजपत्रात नोटीस प्रसिध्द करुन, तीमध्ये ज्या विशिष्ट प्रयोजनांसाठी अशी जमीन आवश्यक असेल ते प्रयोजन विनिर्दिष्ट करुन आणि त्यामध्ये या कलमाला, अनुलक्षून, राज्य शासनाने ती जमीन संपादन करण्याचे ठरवले असल्याचे नमूद करुन, ती जमीन संपादन करता येईल.

**कलम ३२ (२)**

पोटकलम (१) अन्वये नोटीस प्रसिध्द करण्यापूर्वी, राज्य शासनाने, दुस-या नोटीशीव्दारे, जमिनीचा मालक आणि राज्य शासनाच्या मते उक्त जमिनीत जिचा हितसंबंध असेल, अशा इतर कोणत्याही व्यक्तीस, नोटिशीत, निर्दिष्ट करण्यात येईल अशा मुदतीचे आत, जमीन का संपादन करण्यात येऊ नये, याबद्दल कारण दर्शविण्याबद्दल फर्मविल [१]( राज्य शासन कलम ५३ मध्ये घालून दिलेल्या रीतीने, जाहीर नोटीस देण्याची व राजपत्रात ती प्रसिध्द करण्याची व्यवस्था करील):

[२](परंतु, संपादन करण्याचे प्रस्तावित केलेली जमीन, अनुसूचित क्षेत्रामध्ये येत असल्यास, राज्य शासन असे संपादन करण्यापूर्वी,....

(एक) ती जमीन एका पंचायतीच्या क्षेत्रात येत असेल तर, संबंधित ग्रामसभेशी आणि पंचायतीशी,

(दोन) ती जमीन संबंधित गटातील एकापेक्ष अधिक पंचायतीच्या क्षेत्रात येत असेल तर संबंधित ग्रामसभा व पंचायत समितीशी,

(तीन) ती जमीन संबंधित जिल्ह्यातील एकापेक्षा अधिक गटांच्या क्षेत्रामध्ये येत असेल त्या बाबतीत संबंधित ग्रामसभांशी आणि जिल्हा परिषदांशी विचारविनिमय करील,

असा विचारविनिमय, राज्य शासन, याबाबतीत सर्वसाधारण किंवा विशेष आदेश काढून ठरवून देईल अशा रीतीने करण्यात येईल :

परंतु आणखी असे की, संबंधित ग्रामसभांपैकी बहुतांश ग्रामसभांनी वरीलपैकी कोणत्याही बाबतीत ठराव संमत करुन घेतलेला निर्ण संबंधित पंचायत समिती किंवा यथास्थिती, जिल्हा परिषद यावर बंधनकारक राहील.

स्पष्टीकरण — या परंतुकांच्या प्रयोजनाकरिता, ....

(एक) "ग्रामसभा", "पंचायत" व "अनुसूचित क्षेत्रे" या शब्द प्रयोगांना, [३] मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ यात त्यांना अनुक्रमे नेमून देण्यात आलेले अर्थ असतील,

(दोन) "पंचायत समिती" व "जिल्हा परिषदा" यांना, महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ यात त्यांना अनुक्रमे नेमून देण्यात आलेले अर्थ असतील,

---

[१] सन १९६७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११ च्या कलम २ (अ) अन्वये हा भाग जादा दाखल करण्यात आला.

[२] सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४६ च्या कलम ११ द्वारे ही परंतुके जादा दाखल करण्यात आली.

[३] सन २०१२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४, अनुसूची याच्या नोंद क्रमांक ७४ द्वारे, या अधिनियमाच्या संक्षिप्त नावात "महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम" अशी सुधारणा करण्यात आली व ती दिनांक १ मे पासून करण्यात आली असण्याचे मानण्यात येईल.

**कलम ६३(१)**

राज्य शासनास, महामंडळाशी संबंध असलेल्या बाबतीत महामंडळाशी विचारविनिमय केल्यानंतर राजपत्रात प्रसिध्द केलेल्या अधिसूचनेव्दारे, या अधिनियमाचे उद्देश पार पाडण्याकरिता नियम करता येतील: नियम करण्याचा अधिकार

परंतु, या कलमान्वये प्रथम नियम करताना महामंडळाशी विचारविनिमय करण्याची आवश्यकता असणार नाही, परंतु असे नियम केल्यानंतर अशा नियमात सुधारणा करण्याच्या संबंधात महामंडळ ज्या कोणत्याही सूचना करील त्या शासन विचारात घेईल.

## THE MAHARASHTRA INDUSTRIAL DEVELOPMENT RULES, 1962

**Rule 30 :**

1. (30) Period after which no notification shall be issued under first provision to Section 1(3) – The following period are hereby prescribed for different area under the second proviso to sub-section (3) of Section 1 of the Act, after the expiry of which no notification shall be issued by the State Government under the first proviso to the said sub-section (3) directing that chapter VI of the Act shall cease to be in force in these areas or any parts thereof, namely :-

| Area | Period |
|---|---|
| (1) For all areas in which Chapter VI of the Act has been brought into force before the commencement of the Maharashtra Industrial Development (Amendment) Act, 1974 (Mah.XVIII of 1975), on the 15th day of September 1976. | In the case of each area, a period of 20 years from force of Chapter VI in that area under sub-section (3) of Section 1 of the Act. |
| (2) For all areas in which Chapter VI of the Act has been brought into force after the commencement of the Maharasthra Industrial Development (Amendment) Act, 1974 (Mah.XVIII of 1975, on the 15th day of Sept.1976 | In the case of each area, a period of 10 years from the date of bringing into force of Chapter VI in that area under sub-section (3) of section 1 of the Act. |

**महाराष्ट्र शासन राजपत्र**

**असाधारण भाग चार - ब**

वर्ष १ अंक ३६ | मंगळवार जून ९, २००९ / ज्येष्ठ १९, शके १९३१ | पृष्ठे २

किंमत रुपये : १५.००

**असाधारण क्र.१०२**

**प्राधिकृत प्रकाशन**

महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले (भाग एक, एक-अ, आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांच्याव्यतिरिक्त) नियम व आदेश.

उद्योग, उर्जा व कामगार विभाग

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२. दिनांक ८ जून २००९

**अधिसूचना**

**महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, १९६१**

**क्रमांक** आयडीसी २००८/प्र.क्र. ५५१/उ. १४ - महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, १९६१ (१९६२ चा महा.तीन) मधील कलम ६३ चे उप कलम (१) अन्वये प्राप्त अधिकारान्वये, आणि तसेच यासाठी आवश्यक महाराष्ट्र शासनास प्राप्त सर्व अधिकारान्वये, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाशी सल्लामसलत करून महाराष्ट्र औद्योगिक विकास नियमावली, १९६२ मधील खालील नियम पुढीलप्रमाणे सुधारित करण्यात येत आहे:-

१. या नियमांना महाराष्ट्र औद्योगिक विकास (सुधारित) नियमावली, २००९ असे संबोधण्यात येईल.

२. महाराष्ट्र औद्योगिक विकास नियमावली, १९६२ मधील नियम ३० मध्ये -

(अ) परिच्छेद १ मध्ये नमूद क्रमांक व शब्द यामध्ये "२० वर्षे" याऐवजी "४० वर्षे"असा बदल करण्यात येत आहे.



(ब) परिच्छेद २ मध्ये नमूद क्रमांक व शब्द यामध्ये "१० वर्षे" या ऐवजी "३५ वर्षे" असा बदल करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

विद्या हम्पय्या,
**कार्यासन अधिकारी**

## INDUSTRIES, ENERGY AND LABOUR DEPARTMENT

Mantralaya, Mumbai 400 032, dated the 8th June 2009

***NOTIFICATION***

MAHARASHTRA INDUSTRIAL DEVELOPMENT ACT,1961.

No. IDC. 2008/CR.551/Ind.14-In exercise of the powers conferred by sub-section (1) of section 63 of the Maharashtra Industrial Development Act, 1961 (Mah.III of 1962) and all other powers enabling it in that behalf, the Government of Maharashtra, after consulting the Maharashtra Industrial Development Corporation, hereby makes the following rules further to amend the Maharashtra Industrial Development Rules, 1962, as follows:-

1. These rules may be called as the Maharashtra Industrial Development (Amendment) Rules, 2009.
2. In Rule 30 of Maharashtra Industrial Development Rules, 1962-
   (a) In paragraph (1), for the further figures and words "20 Years", the figures and words "40 Years" shall be substituted.
   (b) In paragraph (2), for the further figures and words "10 Years" the figures and words "35 Years" shall be substituted.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

VIDYA HAMPAYYA
**DESK OFFICER**

महाराष्ट्र औदयोगिक विकास अधिनियम, 1961
च्या तरतुदीनुसार संपादित करण्यात येणा-या
जमिनीच्या नुकसान भरपाईचे दर
ठरविण्यासाठीसमितीची नियुक्ती

महाराष्ट्र शासन
उद्योग, ऊजा व कामगार विभाग
शासन निर्णय क्र.आयडीसी 1893/262(1))/उद्योग-14,
मंत्रालय, मुंबई : 400 032
दिनांक : 11 जुलै 1994

वाचा : 1) शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग क्र.आयडीसी-1893/
(262)/उद्योग-14, दि . 14.5.93

प्रस्तावना :

शासनाच्या "नवीन औद्योगिक धोरण -- 1993" अंतर्गत उपरोक्त शासन निर्णयान्वये महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, 1961 च्या कलम 32, 33 (2), 36 व 38 अन्वये वाटाघाटीने भूसंपादन करताना प्रति हेक्टरी रु. 50, 000/- पर्यंत नुकसान भरपाईचे दर ठरविण्याचे अधिकार राज्यातील सर्व जिल्हाधिका-यांना तसेच प्रति हेक्टरी रु. 50,001/- ते रुपये 1,00,000/- पर्यंत नुकसान भरपाईचे दर ठरविण्याचे अधिकार राज्यातील सर्व विभागीय आयुक्तांना प्रदान करण्यात आलेले आहेत. तसेच मुल्यांकन टिप्पण्यांना मंजुरी देताना जिल्हाधिकारी/विभागीय आयुक्त यांच्यासाठी नुकसान भरपाईची निश्चित करण्यात आलेली कमाल मर्यादा रद्द करण्यात आली आहे.

शासन निर्णय :

काही विशिष्ट प्रकरणी जमिनीच्या मोबदल्याचे दर ठरविण्याची बाब वरीलप्रकारे सुपूर्द केलेल्या अधिकारांपेक्षा जास्त होत असेल तर अशा प्रकरणांमध्ये नुकसान भरपाईचे दर ठरविण्यासाठी खालीलप्रमाणे सदस्यांची समिती नियुक्त करण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे :

| | |
|---|---|
| सचिव (उद्योग) | अध्यक्ष |
| सह/उपसचिव (महसूल) | सदस्य |
| सह/उपसचिव (वित्त विभाग) | सदस्य |
| मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ | सदस्य |
| संचालक, नगर रचना, पुणे | सदस्य |

सह/उपसचिव, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग सदस्य-सचिव

2. नागरी जमीन कमाल धारणा कायद्याचा संबंध एखाद्या प्रकरणात असल्यास गृहनिर्माण विभागाच्या संबंधित सह/उप सचिवांना आमंत्रित करण्यात यावे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

सही/
( बी.वी. प्रभू)
शासनाच्या अवर सचिव

प्रति

अतिरिक्त मुख्य सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
प्रधान सचिव (वने), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
प्रधान सचिव, (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
प्रधान सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय
मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, मुंबई
संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे
सचिव, गृहनिर्माण विभाग, मंत्रालय, मुंबई
सर्व विभागीय आयुक्त
सर्व जिल्हाधिकारी

महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, 1961
च्या अंतर्गत भूसंपादन कार्यवाहीसाठी व
जमिनीच्या नुकसान भरपाईचे दर
ठरविण्यासाठी समितीची नियुक्ती

महाराष्ट्र शासन
उद्योग, ऊजा व कामगार विभाग
शासन निर्णय क्र.आयडीसी 1895/(2462)/उद्योग-14,
मंत्रालय, मुंबई : 400 032
दिनांक : 5 जुलै 1996

वाचा : 1) शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग क्र.आयडीसी-1893/(262)/उद्योग-14, दि . 14.5.93
2) शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग क्र.आयडीसी-1893/262/(1)/उद्योग-14, दि. 11/7/94

प्रस्तावना :

केंद्र शासनाने जाहीर केलेल्या नवीन औद्योगिक व आर्थिक धोरणानुसार उद्योगधंदे स्थापन करण्यावरील निर्बंध शिथिल करण्यात आले आहेत अथवा काढून टाकण्यात आले आहेत. त्यादृष्टीने उद्योग धंद्याच्या वाढीस पोषक असे वातावरण निर्माण करण्याची गरज वाटल्याने महाराष्ट्र राज्याची औद्योगिक भूमिका स्पष्ट करणारे धोरण दिनांक 22 एप्रिल 1993 रोजी जाहीर करण्यात आले. त्या अनुषंगाने महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळातर्फे स्थापन करण्यात येणा-या औद्योगिक क्षेत्राच्या भूसंपादनाच्या बाबतीत अधिक गती यावी व अधिकाधिक औद्योगिक क्षेत्रे कमीत कमी कालावधीत निर्माण व्हावीत या दृष्टीने महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियमातील काही तरतुदी, जसे वाटाघाटीने किंमती ठरविणे, निवाडयास मंजुरी देणे, विहिरी व बांधकामाचे मूल्यांकन करणे इत्यादीबाबत येणा-या अडचणी दूर करण्यासाठी आवश्यक त्या सुधारणा करण्यात आल्या आहेत. त्यामध्ये महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, 1961 च्या कलम 32, 33,(2), 36 व 38 अन्वये वाटाघाटीने भूसंपादन करताना प्रती हेक्टरी रु. 50,000/- पर्यंत नुकसान भरपाईचे दर ठरविण्याचे अधिकार राज्यातील सर्व जिल्हाधिका-यांना तसेच प्रती हेक्टरी रु. 50,000 ते 1,00,000 लाखापर्यंत नुकसान भरपाईचे दर ठरविण्याचे अधिकार राज्यातील सर्व विभागीय आयुक्तांना प्रदान करण्यात आलेले आहेत. तसेच मूल्यांकन टिप्पण्यांना मंजुरी देताना जिल्हाधिकारी/विभागीय आयुक्त यांच्यासाठी महसूल व वन विभागाने विहित केलेल्या नुकसान भरपाईची कमाल मर्यादा रद्द करण्यात येऊन जमिनीच्या मोबदल्याचा दर ज्या प्रकरणी हेक्टरी रु. 1,00,000/- लाखापेक्षा जास्त

होत असतील अशा प्रकरणांमध्ये मोबदल्याचे दर ठरविण्यासाठी सचिव (उद्योग) यांच्या अध्यक्षतेखाली समिती नियुक्त करण्यात आली होती.

**<u>शासन निर्णय :</u>**

उपरोक्त समितीऐवजी खालीलप्रमाणे समिती नियुक्त करण्यात येत आहे :

| | |
|---|---|
| 1) सचिव (उद्योग) | अध्यक्ष |
| 2) सचिव वा त्यांचे प्रतिनिधी, महसूल विभाग | सदस्य |
| 3) सचिव वा त्यांचे प्रतिनिधी, वित्त विभाग | -"- |
| 4) सचिव वा त्यांचे प्रतिनिधी,नियोजन विभाग | -"- |
| 5) सचिव वा त्यांचे प्रतिनिधी, पाटबंधारे विभाग | -"- |
| 6) संबंधित विभागीय आयुक्त | -"- |
| 7) संचालक, नगर रचना, पुणे | -"- |
| 8) संबंधित जिल्हाधिका-याचे प्रतिनिधी | -"- |
| 9) संबंधित उपविभागीय अधिकारी | -"- |
| 10) सह सचिव/उपसचिव, उद्योग, उर्जा व कामगार विभाग | -"- |
| 11) मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र औद्योगि विकास महामंडळ | सदस्य-सचिव |

या समितीच्या कार्यकक्षा पुढीलप्रमाणे आहेत :-

**महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, 1961 च्या कलम 1(3) अन्वये प्राथमिक अधिसूचना निर्गमित करुन शासनाचा भूसंपादनाचा हेतू जाहीर करण्यासाठी प्राथमिक छाननी व तत्संबंधी मंजुरी देण्याचे अधिकार सदर समितीस प्रदान करण्यात आले आहेत. जेणेकरुन संबंधित विभागाच्या भूसंपादनाबाबत संबंधित स्तरावर येत असलेल्या आशंकाचे निरसन समितीच्या बैठकीतच केले जाऊन भूसंपादन अधिक गतीमान होईल.**

या जिल्हाधिकारी व विभागीय आयुक्त यांच्याकडून प्राप्त झालेल्या मूल्यांकन टिप्पण्यांना मंजुरी देऊन नुकसान भरपाई निधीची मागणी स्वतंत्रपणे नियोजन विभाग व वित्त विभागाकडे करण्याऐवजी या समितीसमोर ती प्रकरणे ठेवून संबंधितांकडून सहमती घेण्यात येईल.

जिल्हाधिकारी/विभागीय आयुक्त यांचेकडून प्राप्त होणा-या मूल्यांकनाच्या प्रकरणांवर निर्णय घेण्याचे व वाटाघाटीने नुकसान भरपाई ठरविताना जर दर प्रती हेक्टरी रु. 1,00,000/- लाखाहून जास्त होत असल्यास सदर प्रकरणी नुकसान भरपाईच्या मूल्यांकन टिप्पणीस पुढील मान्यता देण्याचे अधिकार समितीस प्रदान करण्यात आले आहेत.

हया व्यतिरिक्त महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम 1961 च्या कलम 33 (3 ) अन्वये शासनाकडे उपलब्ध झालेली प्रकरणेही या समितीसमोर सहमतीसाठी सादर करण्यात येतील.

एखाद्या प्रकरणात नागरी जमीन कमाल धारणेचा संबंध असल्यास अथवा पाणी पुरवठा विभागाशी संबंध पोहचत असल्यास त्याप्रमाणे गृहनिर्माण विभागाच्या तसेच पाणी पुरवठा विभागाच्या संबंधित सह सचिवांना/उप सचिवांना आमंत्रित करण्यात येईल.

त्याप्रमाणे समितीपुढे होत असलेल्या कार्यवाहीचा दर सहा महिन्यांना आढावा घेण्यात येईल.

हे आदेश वित्त विभाग व नियोजन विभागाच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

सही/-
( सौ. शैलजा घरत )
शासनाच्या उपसचिव

प्रति,
सचिव वा त्यांचे प्रतिनिधी, महसूल व वन विभाग
सचिव वा त्यांचे प्रतिनिधी, वित्त विभाग
सचिव वा त्यांचे प्रतिनिधी, नियोजन विभाग
सचिव वा त्यांचे प्रतिनिधी, पाटबंधारे विभाग
सर्व विभागीय आयुक्त,
संचालक, नगर रचना, पुणे
सचिव, गृहनिर्माण विभाग, मंत्रालय, मुंबई
सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व उप विभागीय अधिकारी,
सह सचिव/उप सचिव. उद्योग. उर्जा व कामगार विभाग.
मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, मुंबई
स्वीय सचिव, सचिव (उद्योग)

## प्रकरण ५

### चौकशीत आढळून आलेले तथ्य

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने गेल्या १५ वर्षांच्या कालावधीत एकूण १६० जमीनी गैर अधिसूचीत करण्याची प्रकरणे हाताळली होती. त्या प्रत्येक प्रकरणामध्ये शासनाकडून अपेक्षित माहिती समितीने बोलविली होती. उद्योग विभागकडून अशा १६० प्रकरणांपैकी १२३ प्रकरणांबाबत माहिती समितीसमोर सादर केली. उद्योग विभागाच्या नोडल अधिकाऱ्याने समितीस असे सांगितले की उरलेल्या ३८ प्रकरणांच्या, विभागामध्ये शोध घेतला असता, नस्त्या प्राप्त होऊ शकल्या नाहीत. त्यामुळे त्या ३८ प्रकरणांमध्ये महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या अभिप्रायाशिवाय दुसरे अभिप्राय समितीसमोर नाहीत. समितीने आपले निष्कर्ष उपलब्ध अभिलेखे तपासून अंतिम केलेले आहेत.

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने माहित्ती देताना त्यांच्या अभिप्रायामध्ये काही ठिकाणी सर्व अधिकारी/कर्मचाऱ्यांची नावे लिहिलेली नाहीत. तथापि, ही माहिती शासन स्तरावर सुध्दा मागवून घेता येईल. त्याचप्रमाणे उद्योग विभागाने वरील सर्व १२३ प्रकरणांमध्ये आवश्यक ते अधिकारी/कर्मचारी आणि त्यांच्याशी संबंधितांची माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे.

जमीन अधिसूचित (अर्थात प्रकरण ६ लागू) करताना थोडया तरी प्रक्रियेमध्ये पारदर्शकता आणण्याकरिता खातेदारांना संधी देणे आवश्यक आहे.

औद्योगिक जमीन अधिसूचीत किंवा गैर अधिसूचीत करतांना मार्गदर्शक तत्वे महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या संचालक मंडळाच्या स्तरावर सुनिश्चीत करण्यात यावेत.

दिनांक २८/८/२०१७ रोजीच्या शासन निर्णयाप्रमाणे चौकशीची कार्यकक्षा खालील प्रमाणे आहे.

अ) प्रश्नाधीन औद्योगिक क्षेत्रातील जमीन गैर अधिसुचीत करण्याचा निर्णय घेण्यापूर्वी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांनी मागील १५ वर्षात अन्य औद्योगगिक क्षेत्रात व प्रश्नाधीन औद्योगिक क्षेत्रात गैर अधिसूचित करण्याचा निर्णय घेतला आहे का?

आ) उक्त क्षेत्र गैर अधिसूचीत करताना महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या अधिनियम अथवा महामंडळाच्या जमीन विषयक अधिनियम/नियम/मार्गदर्शक तत्वे यांच्यानुसार गैरअधिसूचीत करण्यात आले आहे का?

इ) उक्त क्षेत्र गैर अधिसूचीत प्रकरणी Conflict of Interest निदर्शनास येतो का?

ई) उक्त प्रकरणच्या अनुषंगाने अन्य इतर महत्वाच्या त्रुटी/उणीवा निदर्शनास येतात का?

परिच्छेद २ (अ) प्रमाणे प्रश्नाधीन औद्योगिक क्षेत्रांतील जमीन गैर अधिसुचित करण्याचा निर्णय घेण्यापूर्वी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांनी मागील १५ वर्षात अन्य औद्योगिक क्षेत्रात व प्रश्नाधीन औद्योगिक क्षेत्रात जमीन गैर अधिसुचित करण्याचा निर्णय घेतला आहे का, याचे विश्लेषण खालीलप्रमाणे आहे.

समितीने महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून सविस्तर माहिती प्राप्त करुन घेतली होती. तसेच महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने दिलेल्या माहितीवर उद्योग विभागाकडून त्यांचे अभिप्राय सुध्दा मागविण्यात आले होते. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या अधिकाऱ्यांबरोबर, तसेच अपर मुख्य सचिव, उद्योग विभाग आणि उप सचिव यांच्याबरोबर अनेक बैठका आयोजित करुन चर्चा ही करण्यात आल्या होत्या.

उपलब्ध माहितीवरुन महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने दिनांक २८/०८/२०१७ च्या पूर्वी, १५ वर्षात अर्थात २८.८.२००२ पासून प्रश्नाधीन औद्योगिक क्षेत्रातील जमीन व अन्य औद्योगिक क्षेत्रातील जमीनी गैर अधिसूचीत करण्याचा निर्णय घेतला होता असे स्पष्टपणे दिसून आले. ही माहिती चौकशी अहवालाच्या खंड २/३ मध्ये पृष्ठ क्र. १ ते पृष्ठ क्र. ३०८ यावर आहे. त्यामुळे या प्रश्नाचे उत्तर **'होय'** असेच द्यावे लागेल.

**परिच्छेद २ आ नुसार** उक्त क्षेत्र गैर अधिसूचीत करताना महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या अधिनियम अथवा महामंडळाच्या जमीन विषयक अधिनियम/नियम/मार्गदर्शक तत्वे यांच्यानुसार गैरअधिसूचीत करण्यात आले आहे का याचं विश्लेषण पुढील परिच्छेदात दिलेले आहे.

उक्त क्षेत्र गैर अधिसूचीत करताना महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या अधिनियम अथवा महामंडळाच्या जमीन विषयक सर्व अधिनियम/नियम/ मार्गदर्शक तत्त्वे यांच्या अनुसारच जमीनी गैर अधिसूचीत करण्यात आले होते असे दिसून येत नाही. समितीच्या असे निदर्शनास आले आहे की काही प्रकरणांमध्ये महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या अधिनियमांखालील नियमांचे तंतोतंत पालन करण्यात आलेले नाही. किंबहुना, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या जमीन विषयक नियमांचे उल्लेख जवळ जवळ सर्वच प्रकरणांच्या नस्तीतील टिप्पणीमध्ये करण्यात आलेला नव्हता. जर कोणी टिप्पणीचे वाचन केले तर असे स्पष्टपणे दिसून येईल की, अत्यंत मोघम स्वरुपाची टिप्पणी सादर करण्यात येत होती. जमीन गैर अधिसूचीत करण्यासाठी १९७५ या वर्षी पहिल्यांदा अधिनियमांमध्ये सुधारणा (amendment) करण्यात आली होती, त्याप्रमाणे पहिल्यांदाचा नियम करुन

कालमर्यादाही टाकण्यात आली होती. म्हणजेच ही सुधारणा व नियम होण्यापूर्वी जमीन गैर अधिसुचीत करण्यासाठी कोणतीही पध्दत किंवा कालमर्यादा नव्हती. दिनांक १५.९.१९७६ रोजी शासनाने अधिनियमाची सुधारणा लागू करुन पहिल्यांदाच जमीन गैर अधिसूचीत करण्यासाठी एक ठराविक कालमर्यादा ठरविण्यासाठी नियम तयार करण्याची तरतूद केली होती. ती तरतूद खालीलप्रमाणे करण्यात आली.

"(३) हा अधिनियम, त्याचे प्रकरण ६ खेरीज करुन, तात्बडतोब अंमलात येईल; प्रकरण ६ हे राज्य शासन राजपत्रातील अधिसूचनेव्दारे त्याबाबतीत वेळोवेळी नेमून देईल त्या क्षेत्रात व त्या दिनांकापासून अंमलात येईल:

१[ परंतु, जर राज्य शासनाच्या मते जेथे प्रकरण सहा अंमलात आणले आहे अशा कोणत्याही क्षेत्राची किंवा त्याच्या कोणत्याही भागाची औद्योगिक क्षेत्र म्हणून विकसित करण्याच्या प्रयोजनासाठी, आवश्यकता नसेल किंवा आवश्यकता पडण्याचा संभव नसेल तर, राज्य शासनास, तत्सम अधिसूचनेव्दारे, अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा दिनांकास, अशा दिनांकाच्यापूर्वी केलेल्या किंवा करण्याचे वर्जिलेल्या गोष्टीबाबत असेल त्याव्यतिरिक्त, त्या क्षेत्रात किंवा त्याच्या कोणत्याही भागात प्रकरण सहा अंमलात असण्याचे बंद होईल, असा निदेश देता येईल :

*परंतु आणखी असे की, प्रकरण सहा अंमलात आणल्याच्या दिनांकापासून विहित करण्यात येईल अशा कालावधीच्या समाप्तीनंतर राज्य शासनाकडून पहिल्या परंतुकाखाली कोणतीही अधिसूचना काढण्यात येणार नाही आणि महाराष्ट्र औद्योगिक विकास (सुधारणा) अधिनियम, १९७४ याच्या प्रारंभापूर्वी ज्यामध्ये प्रकरण सहा अंमलात आणले असेल अशी क्षेत्रे आणि अशा प्रारंभानंतर ज्यामध्ये प्रकरण सहा अंमलात आणले जाईल अशी क्षेत्रे यांसाठी वेगवेगळे कालावधी विहित करता येतील)"*

वरील अधिनियमामध्ये झालेल्या सुधारणांचा अभ्यास केला आणि त्या सुधारणांच्या (अमेंडमेंटच्या) अनुषंगाने जे नियम ३० तयार करण्यात आले त्यांचाही अभ्यास केला तर असे दिसून येईल की जमीन गैर अधिसूचीत करण्यासाठी १९७६ च्या पूर्वी अधिसूचित झालेल्या जमीन प्रकरणांमध्ये २० वर्षांची कालमर्यादा टाकण्यात आली होती, आणि १९७६ नंतर ज्या जमीनी अधिसूचीत झाल्या ती प्रकरणे गैर अधिसूचीत प्रकरणांसाठी १० वर्षांची कालमर्यादा टाकण्यात आली. उदाहरणस्वरुप पहायचे असल्यास, तर प्रकरण ६ लागू करण्यासाठीची एखादी अधिसूचना जर १९.१२.१९७३ तारखेला झाली असेल तर ती दिनांक १८.१२.१९९३ पर्यंत गैर अधिसूचीत करता येत होती (म्हणजेच २० वर्षांपर्यंत). त्या तारखेच्या नंतर जमीन गैरअधिसूचीत करणे नियमबाह्य ठरत होते. तसेच दुसरे उदाहरण म्हणजे, प्रकरण ६ लागू करण्यासाठीची एखादी अधिसूचना जर ३.३.१९७७ तारखेला झाली असेल, तर ती दिनांक २.३.१९८७ पर्यंतच गैर अधिसूचीत करण्याचे अधिकार शासनाकडे होते. त्या तारखेनंतर गैर अधिसूचीत केलेले कृत्य नियमबाह्य ठरणार होते. समितीच्या असे निर्दशनास आले की, काही प्रकरणांमध्ये वरील कालमर्यादा संपल्यानंतरही, गैर अधिसूचीत करण्याचा निर्णय शासनाने घेतला. यापैकी काही नस्तींचे अवलोकन केले असता असे दिसून आले की, नस्तींमधील कार्यालयीन टिप्पणींमध्ये या नियमांचा उल्लेखच केला गेला नाही. टिप्पणींमध्ये उल्लेख न करण्याची कारणे कळू शकली नाहीत. कार्यालयीन टिप्पणीमध्ये नियमांचा उल्लेख न करणे ही अत्यंत गंभीर बाब आहे आणि त्यासाठी ज्या ज्या प्राधिकाऱ्यांनी नस्ती हाताळली ते सर्व प्राधिकारी जबाबदार आहेत असे समितीचे मत आहे. प्रत्येक प्रकरणाची माहिती खंड २/३ मध्ये सविस्तरपणे दिली आहे. याचा अभ्यास केला तर वरील बाब अधिक स्पष्ट होऊ शकेल.

टिप्पणीमध्ये महाराष्ट्र औद्योगिक विकास नियम, १९६२ चे नियम ३० चा उल्लेख न करणे हे मुद्दाम करण्यात आलेले आहे की "Systemic Error" आहे किंवा नियम लक्षात न राहिल्यामुळे झाले आहे, या निष्कर्षापर्यंत समिती येऊ शकली नाही, कारण नस्ती हाताळणारे तत्कालीन अधिकारी उपलब्ध होऊ शकले नाहीत. तथापि, कार्यालयीन टिप्पणीमध्ये सर्व अधिनियम/नियम/शासन निर्णय/परिपत्रक इत्यांदीचा उल्लेख करणे ही अत्यंत गरजेची बाब आहे आणि या बाबीकडे दुर्लक्ष झाले, तर नस्ती व्यवस्थीतपणे हाताळली गेली असे मुळीच म्हणता येणार नाही. म्हणून समितीचे असे मत आहे की, ज्या ज्या प्रकरणांमध्ये काल मर्यादेच्या पलीकडे जाऊन गैर अधिसूचीत करण्याचा निर्णय घेतला आहे, त्या त्या प्रकरणांमध्ये कनिष्ठतम कर्मचाऱ्यांपासून वरिष्ठतम प्राधिकाऱ्यांपर्यंत जे जे जबाबदार आहेत, त्यांच्यावर शासनाने उचित कार्यवाही करणे योग्य राहील. या अहवालामध्ये संकलीत

केलेल्या सर्व प्रकरणांमध्ये कनिष्ठतम कर्मचाऱ्यांपासून वरिष्ठतम प्राधिकारी कोण कोण होते याचाही उल्लेख जवळ जवळ प्रत्येक प्रकरणामध्ये केलेला आहे. त्यावरुन संबंधित कर्मचारी/प्राधिकारी यांच्या विरुध्द शासनाला उचित कार्यवाही करणे सोपे जाईल. संकलीत केलेल्या प्रकरणांपैकी काही प्रकरणांमध्ये नस्ती हाताळणारे प्राधिकारी कोण कोण होते याची माहिती वारंवार सूचना देऊनही महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून किंवा उद्योग विभागाकडून समितीला प्राप्त होऊ शकली नाही. तथापि, शासकीय अभिलेख (रेकॉर्डवरुन) पाहून शासनाला ही माहिती केव्हांही उपलब्ध करुन घेता येईल. कोणत्याही प्रकरणामध्ये महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने आणि उद्योग विभागाने सर्व प्रकारची माहिती, , अधिनियमांचा उल्लेख, नियमांचा उल्लेख, परिपत्रकं इत्यादींचा उल्लेख करुनच निर्णय घेणाऱ्या अंतिम प्राधिकाऱ्यांकडे सादर करणे अपेक्षित आहे. ज्या ज्या प्रकरणांमध्ये, कार्यालयीन टिप्पणीमध्ये नियमांचा उल्लेख करण्यात आलेला नाही, त्या त्या प्रकरणांमध्ये वरिष्ठतम प्राधिकाऱ्याला झालेल्या नियमबाह्य निर्णयांबद्दल जबाबदार ठरविणे योग्य होणार नाही असे समितीला वाटते. जर नियमांमध्ये स्पष्टपणे सर्व कायदेशीर तरतुदींचा उल्ल्लेख केला असता आणि वरिष्ठतम प्राधिकाऱ्याने नियमानुसार दिलेल्या सल्ल्याच्या विपरित निर्णय घेतला असता तर ते नियमबाह्य निर्णयाला जबाबदार राहिले असते. प्रस्तूत प्रकरणांमध्ये कार्यालयीन कर्मचारी/अधिकारी, ज्यांनी ज्यांनी ही नस्ती हाताळली आणि ज्यांच्या ज्यांच्याकडून नियमांचा उल्लेख करणे राहून गेले, ते पूर्णपणे जबाबदार आहेत असे समितीचे स्पष्ट मत आहे.

काही प्रकरणांमध्ये असे दिसून आले की, जमीन गैर अधिसूचीत करण्याचा निर्णय कालमर्यादेच्या आतच घेण्यात आला होता, परंतु महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या किंवा उद्योग विभागाचा सल्ला विपरित होता. अर्थात गैर अधिसूचीत करु नये असा स्पष्टपणे सल्ला देण्यात आला होता. अशी अनेक प्रकरणे दिसून आली की जेथे महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने किंवा उद्योग विभागाने जमीन गैर अधिसूचीत न करण्याचा सल्ला दिलेला असतानाही वरिष्ठतम प्राधिकाऱ्याने म्हणजेच मा. मंत्री (उद्योग) यांनी जमीन गैरअधिसूचीत करण्याचा निर्णय घेतला. हे खंड २/३ मध्ये दिलेल्या प्रकरणांचा अभ्यास केल्यास स्पष्ट होईल.

कामकाज अनुदेशाप्रमाणे (Business Rules) शासनाला अर्थात मंत्री महोदयांना, विभागाचा अथवा कनिष्ठ प्राधिकाऱ्याचा सल्ला न स्वीकारता कारणमिमासा देऊन विपरित निर्णय घेण्याचा पूर्ण अधिकार आहे. त्यामुळे या प्रकरणांमध्ये मा. मंत्री (उद्योग) हेच जबाबदार आहेत असे म्हणणे उचित होणार नाही. या बाबतीत शासनाने वेळोवेळी आदेशही काढले आहेत.

शासनाच्या कामकाज अनुदेशाप्रमाणे (Business Rules) जर सचिव आणि मंत्री यांच्यामध्ये मत भिन्नता असेल तर अशा प्रकरणांमध्ये सचिवांना मुभा आहे की, ते त्यांच्या कारणमिमांसेसह प्रकरण मुख्य सचिवांमार्फत मा. मुख्य मंत्री यांच्या नजरेस आणु शकतील आणि मा. मुख्य मंत्री यांनी दिलेले आदेश अंतिम समजण्यात येतील. कोणत्याही प्रकरणामध्ये समितीला असे दिसून आले नाही की, उद्योग विभागाच्या सचिव आणि उद्योग मंत्री यांच्यामध्ये मत भिन्नता असल्याने सचिवांनी संबंधित प्रकरण मुख्य सचिवांमार्फत मा. मुख्य मंत्री यांचेकडे पाठविली आणि मा. मुख्य मंत्री यांच्या निदर्शनास आणून पुढील कार्यवाही केली. अर्थात जो निर्णय मा. मंत्री उद्योग यांनी दिला तो निर्णय उद्योग सचिवांनीही नंतर मान्य केला. त्यामुळे मा. मंत्री महोदयांनी जेथे जेथे आपला स्वेच्छाधिकार (discretion) वापरुन निर्णय दिलेला आहे आणि जेथे जेथे उद्योग सचिव किंवा महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या मताच्या विरोधात जाऊनही निर्णय दिला आहे त्या प्रकरणामध्ये तांत्रिकदृष्ट्या त्यांना जबाबदार धरता येणार नाही. अशी प्रकरणे अनेक आहेत. तथापि त्याच्यावर समितीने भाष्य करावे असे अपेक्षित नाही.

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाची मौजे गोंदेदुमाला आणि वाडिवरे, ता. इगतपूरी, जि. नाशिक येथील अधिग्रहीत जमीन गैर अधिसुचीत करण्याच्या मा. मंत्री (उद्योग) यांनी घेतलेल्या निर्णयाबाबत समितीने जी माहिती महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ आणि उद्योग विभाग यांच्या कडून प्राप्त करुन घेतली होती त्या नस्तींच्या माहितीसह, **श्री. सुभाष देसाई, मा. मंत्री (उद्योग)** यांना समितीने एक पत्र दिनांक १४ डिसेंबर, २०१७ रोजी पाठविले होते. समितीने मा. मंत्री (उद्योग) यांना अवगत केले होते की मंत्री म्हणून त्यांनी घेतलेल्या विविध निर्णयांच्या बाबतीत जर त्यांना काही अधिक स्पष्टता आणायची असेल तर ते दिनांक २१ डिसेंबर २०१७ पर्यंत लेखी माहिती समितीला देऊ शकतील.

श्री. सुभाष देसाई, मा मंत्री (उद्योग) यांनी त्यांचे पत्र दिनांक १८ डिसेंबर २०१७ अन्वये, महाराष्ट्र विधीमंडळाचे हिवाळी अधिवेशन सुरु असल्याकारणाने दिनांक २८ डिसेंबर २०१७ पर्यंत मुदतवाढ मागितली होती. त्याप्रमाणे समितीने त्यांची विनंती मान्य केली. श्री. सुभाष देसाई, मा. मंत्री (उद्योग) यांनी दिनांक १ जानेवारी २०१८ रोजी त्यांचे पत्र क्र. उद्योग, खनिकर्म/व्हीआयपी/५७१/२०१८ अन्वये त्यांचे लेखी निवेदन समितीपुढे सादर केले.

समितीने मा. मंत्री (उद्योग) यांच्याकडून प्राप्त निवेदनाचा सखोल अभ्यास केला आणि त्यांच्याशी संबंधित सर्व निर्णयांच्या बाबतीत त्यांचे म्हणणे समजून घेतले.

मौजे गोंदेदुमाला आणि वाडिवरे, ता. इगतपूरी, जि. नाशिक येथील अधिग्रहीत जमीन हे प्रकरण खंड २/३ मध्ये पृ. क्र. १५,१६,१७,१८,१९,४९,५०,५१,५२,५३,५४,७४,७५,७६,७७,२१६ वर आहे. मा. मंत्री (उद्योग) श्री. सुभाष देसाई यांनी दिलेल्या त्यांच्या निवेदनामध्ये उल्लेख केल्याप्रमाणे अधिगृहीत करण्यास जनतेचा तीव्र विरोध होता. वारंवार या बाबतीत बैठकाही झाल्या होत्या. जिल्हाधिकाऱ्यांनीही या जमीनी अधिगृहीत करु नये अशा शिफारशी केल्या होत्या. अधिगृहीत करण्यासाठी गैरवाजवी मोबदल्याची (compensation) मागणीही शेतकऱ्यांकडून करण्यात येत होती. या सर्व पार्श्वभूमीवर मा. मंत्री (उद्योग), श्री. सुभाष देसाई यांनी जो निर्णय घेतला तो त्यावेळी प्राप्त परिस्थितीवरुन/कारणावरुन (circumstances) घेतला. त्यामुळे आता त्या निर्णयांवर वाद उपस्थित करणे योग्य होणार नाही असे समितीला वाटते.

या अहवालाच्या खंड २/३ मधील प्रपत्रांमध्ये ज्या ज्या जमीनी दाखविण्यात आल्या आहेत त्या गैर अधिसूचीत झालेल्या भुखंडांची संख्या एकंदर १६० आहे. यापैकी अनेक प्रकरणात तत्कालीन मा. **मंत्री (उद्योग) श्री. नारायण राणे** यांनी निर्णय घेतला होता. ती संख्या मोठी असल्यामुळे श्री. नारायण राणे यांनाही समितीने दिनांक १४.१२.२०१७ च्या पत्राप्रमाणे अवगत केले होते. तसेच ज्या ज्या प्रकरणांमध्ये भूखंड गैरअधिसूचीत करण्यात आले त्या त्या प्रकरणांमध्ये तत्कालीन मा मंत्री उद्योग यांना जर काही स्पष्टता आणावयाची असल्यास, तर त्यांनी तसे समित्ती समोर विशद करावे अशी विनंती करण्यात आली होती. मा. मंत्री (उद्योग) श्री. नारायण राणे यांनाही १८.१२.२०१७ तारखेपर्यंत त्यांची कारण-मिमांसा विशद करण्यासाठी मुदत देण्यात आली होती. तत्कालीन मा. मंत्री उद्योग, श्री. नारायण राणे यांनी त्यांच्या दिनांक १८.१२.२०१७ च्या पत्राप्रमाणे ७ दिवसाची समितीने वाढवून द्यावी अशी विनंती केली होती. त्यांच्या विनंतीला अनुसरुन समितीने त्यांना सर्व प्रकरणांवर माहिती देण्यासाठी वाढीव मुदत देणे मान्य केले. तत्कालीन मा. उद्योग मंत्री, श्री नारायण राणे यांनी त्यांच्या दिनांक २९.१२.२०१७ च्यापत्रा सोबत प्रत्येक प्रकरणावर घेतलेल्या निर्णयाची कारणमिमांसा दाखविणारी एक पुस्तिका सादर केली. त्या पुस्तिकेत त्यांनी प्रत्येक प्रकरणामागे निर्णय घेण्याची कारणे काय होती, विभागाने काय प्रस्तावित केले होते आणि महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाची काय भुमिका होती, हेही नमुद केले. या सर्व प्रकरणांचा अभ्यास करताना समितीने प्रत्येक भूखंड गैर अधिसूचीत करताना, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने सादर केलेल्या टिप्पणींचे अवलोकन केले. त्याचप्रमाणे त्या प्रकरणांमध्ये उद्योग विभागाचे काय म्हणणे होते, याचेही अवलोकन केले. या पार्श्वभूमीवर शासनाच्या स्तरावर अर्थातच तत्कालीन मा. उद्योग मंत्री यांच्या स्तरावर काय निर्णय

घेण्यात आला होता आणि त्यामागची त्यांची भुमिका काय होती याचाही अभ्यास समितीने केला. संपूर्ण विश्लेषण केल्यानंतर खालीलप्रमाणे काही बाबी निदर्शनास आल्या:-

१. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या विविध नस्तींवर जी कार्यालयीन टिप्पणी सादर करण्यात आली होती, त्या टिप्पणीमध्ये भूखंड गैर अधिसूचीत करण्यासाठी कालमर्यादा काय घालण्यात आली होती आणि कोणत्या नियमानुसार घालण्यात आली होती, याचा उल्लेख कोठेही दिसून आलेला नाही.

२. काही भूखंड गैरअधिसूचीत करण्याची नस्ती, महामंडळाचे अध्यक्ष म्हणून थेट तत्कालीन मा. मंत्री उद्योग यांच्याकडे सादर करण्यात आल्या होत्या. त्या नस्ती विभागाच्या स्तरावर हाताळण्यात आल्या नव्हत्या.

३. काही भूखंड गैरअधिसूचीत करण्याचे प्रस्ताव महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने उद्योग विभागाला सादर केले होते आणि उद्योग विभागाने त्या नस्तींवर सचिवांपर्यंतचे अभिप्राय नोंदवून तत्कालीन मा. मंत्री (उद्योग) यांच्याकडे सादर केले होते.

४. वरील २ व ३ वरुन असे दिसून येते की, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने काही प्रकरणे थेट महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे अध्यक्ष म्हणून, श्री. नारायण राणे तत्कालीन मा. उद्योग मंत्री यांच्याकडे सादर केले होते, तर इतर काही प्रकरणे महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने उद्योग विभागामार्फत मा उद्योग मंत्री यांच्याकडे सादर केले होते. म्हणजेच महामंडळाने काही विशिष्ट प्रकरणांमध्ये थेट महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे अध्यक्ष यांचेकडून आदेश प्राप्त करुन घेतले आणि इतर विशिष्ट प्रकरणांमध्ये शासनाच्या उद्योग विभागामार्फत सादर करणे योग्य ठरविले. एकाच प्रकारच्या कार्यवाहीसाठी दोन वेगवेगळया कार्यपध्दती (procedure) का अनुसरण्यात आली याचे काही समाधानकारक उत्तर कोणत्याही अधिकाऱ्याकडून प्राप्त होऊ शकले नाही.

५. समितीच्या असे निदर्शनास आले आहे की, व्यथित शेतकरी किंवा त्यांचे प्रतिनिधी किंवा लोक प्रतिनिधी यांनी सादर केलेल्या निवेदनांवर, काही वेळा सचिव उद्योग यांचे मार्फत नस्ती सादर करण्याचे आदेश देण्यात आले, तर काही वेळा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांना नस्ती सादर करण्याचे आदेश देण्यात आले. याचा अर्थ असा की काही वेळा शासनाचे वरिष्ठतम प्राधिकारी म्हणजे उद्योग मंत्री या नात्याने प्रकरण सादर करण्याचे आदेश देण्यात आले तर काही वेळा महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे अध्यक्ष, या नात्याने प्रकरण सादर करण्याचे आदेश देण्यात आले.

६. तत्कालीन मा. उद्योग मंत्री श्री. नारायण राणे यांनी प्रत्येक प्रकरणाची माहीती सविस्तरपणे त्यांनी दिलेल्या पुस्तिकेत सादर केलेली आहे. प्रत्येक प्रकरणाचा अभ्यास केल्यानंतर समितीला असे दिसून येते की, कार्यालयीन टिप्पणीमधील अचुक कायदेशीर सल्ल्या अभावी ("in the absence of correct legal advice in the office notes,") निवेदनकर्त्यांची बाजू भक्कम समजून, निवेदनकर्त्यांच्या गाऱ्हाण्याचे निराकरण करण्यासाठी तत्कालीन उद्योग मंत्री यांनी निर्णय घेतला. त्यामुळे उक्त क्षेत्र गैर अधिसूचीत करतांना महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे अधिनियम अथवा महामंडळाच्या जमीनविषयक अधिनियम/नियम/मार्गदर्शक तत्वे यांच्यानुसारच गैर अधिसूचीत करण्यात आले असे म्हणता येणार नाही. तथापि, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ आणि शासनाच्या स्तरावरुन योग्य सल्ला न प्राप्त झाल्यामुळे, काही क्षेत्र गैर अधिसूचीत करण्यात आले. जर कायदेशीर बाजू भक्कमपणे मांडण्यात आली असती तर अशी काही प्रकरणे, ज्यात भूखंड गैर अधिसूचीत करण्यात आलेले आहेत, अशी प्रकरणे उदभवली नसती. या सर्व पार्श्वभूमीवर भुखंड गैरअधिसूचीत करतांना नियमांचे पालन केले नाही असे म्हणणे, समितीला योग्य वाटत नाही कारण तांत्रिकदृष्ट्या तत्कालीन मा. उद्योग मंत्री यांना उद्योग विभागाचे वरिष्ठतम शासकीय प्राधिकारी म्हणून स्वेच्छाधिकार (discretion) वापरण्याचा अधिकार आहे.

समितीने वर उल्लेखीत केल्याप्रमाणे, ज्या ज्या प्रकरणांमध्ये उद्योग विभागाचे सचिव आणि उद्योग विभागाचे मंत्री यांच्यामध्ये मत-भिन्नता होती, त्या त्या प्रकरणांमध्ये उद्योग विभागाच्या सचिवांना ही प्रकरणे मुख्य सचिवांमार्फत मा. मुख्य मंत्री यांचेकडे सादर करुन स्पष्ट आदेश मागवून घेण्याची मुभा होती. तथापि, समितीला खेदाने असे म्हणावेसे वाटते की कोणत्याही मत-भिन्नतेच्या प्रकरणांमध्ये महामंडळाने किंवा उद्योग विभागाच्या तत्कालीन उद्योग सचिवांनी मुख्य सचिवांच्या नजरेस आणून मा मुख्य मंत्र्यांपर्यंत जाऊन स्पष्ट आदेश प्राप्त करुन घेण्याची आवश्यकता भासली नाही. म्हणण्याचा हेतू असा की, तत्कालीन मा. मंत्री उद्योग यांनी ज्या ज्या वेळी विभागाच्या अभिप्रायाच्या विरुध्द जाऊन निर्णय घेतला त्या त्या वेळी विभागीय सचिवांपासून कनिष्ठतम अधिकाऱ्यांपर्यंत सर्वांनी तो निर्णय नंतर मान्यही केला व अंमलबजावणीही केली.

अन्य काही प्रकरणांमध्ये उदाहरणार्थ या अहवालाच्या खंड २/३ च्या पृष्ठ क्र.१३ वरील अ.क्र.१५७ (नाशिक प्रादेशिक कार्यालय, श्रीरामपूर औद्योगिक क्षेत्र मधील १.२३ हे. क्षेत्र) वरील जमीन नियमबाह्य पध्दतीने गैर अधिसूचीत करण्यात आलेली आहे. तसेच अहवालाच्या खंड २/३ च्या पृष्ठ क्र.२८७ वरील अ.क्र.१५३ (सांगली प्रादेशिक कार्यालय, अतिरीक्त सोलापूर औद्योगिक क्षेत्र मधील

२८४.६७ हे. क्षेत्र) वरील जमीन नियमबाह्य पध्दतीने गैर अधिसूचीत करण्यात आलेली आहे. हा पध्दतशीर दोष दूर करण्यासाठी आणि भविष्यात असा निष्काळजीपणा होऊ नये यासाठी आवश्यक ती पावले उचलणे तसेच आवश्यक ती तरतूद करणे उचित आहे. समितीने कार्यकक्षा २ ई च्या अनुषंगाने **"इत्तर महत्वाच्या त्रुटी/उणिवा"** या शिर्षकाखाली काही सूचना केल्या आहेत. जर या सूचनांचा शासनाने यथोचित विचार केला तर असे प्रसंग भविष्यकाळात उदभवणार नाहीत असे समितीला वाटते.

**२ इ) उक्त क्षेत्र गैर अधिसूचीत प्रकरणी Conflict of Interest निदर्शनास येतो का?**

समितीने विविध स्तरावर चर्चा करुन व विविध नस्त्यांचे अवलोकन करुन, तसेच तत्कालीन मा. मंत्री उद्योग श्री नारायण राणे व मा. मंत्री उद्योग श्री सुभाष देसाई यांचे विश्लेषणात्मक अभिप्राय पाहून, कोणत्याही प्रकरणांमध्ये conflict of interest आहे या निष्कर्षापर्यंत समिती आली नाही. म्हणजेच भूखंड गैर अधिसूचीत करण्याच्या प्रकरणांमध्ये conflict of interest स्पष्टपणे दिसून येत नाही.

## प्रकरण ६

## समितीचे निष्कर्ष

शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक : एमआयएन-१२१७/प्र.क्र.१८८/१७/२१, दिनांक २८ ऑगस्ट २०१७ प्रमाणे समितीची कार्यकक्षा निश्चित करण्यात आलेली आहे. समितीने त्याप्रमाणे आपले निष्कर्ष खालीलप्रमाणे काढले आहेत :

**मुद्दा क्र.२ अ)** प्रश्नाधीन औद्योगिक क्षेत्रातील जमीन गैर अधिसूचित करण्याचा निर्णय घेण्यापूर्वी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांनी मागील १५ वर्षात अन्य औद्योगिक क्षेत्रात व प्रश्नाधीन औद्योगिक क्षेत्रात जमीन गैर अधिसूचित करण्याचा निर्णय घेतला आहे का ?

**निष्कर्ष :** होय. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांनी मागील १५ वर्षात म्हणजेच दिनांक २८ ऑगस्ट २००२ ते दिनांक २८ ऑगस्ट २०१७ पर्यंत अन्य औद्योगिक क्षेत्रात व प्रश्नाधीन औद्योगिक क्षेत्रात एकुण १६० प्रकरणांमध्ये जमीन गैर अधिसूचित करण्याचा निर्णय घेतलेला आहे.

**मुद्दा क्र.२ आ)** उक्त क्षेत्र गैर अधिसूचित करताना महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या अधिनियम अथवा महामंडळाच्या जमीन विषयक अधिनियम / नियम/ मार्गदर्शक तत्वे यांच्यानुसार गैर अधिसूचित करण्यात आले आहे का ?

**निष्कर्ष :** उक्त क्षेत्रामध्ये सर्वच्या सर्व जमिनी (प्रकरणे) गैर अधिसूचित करताना महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे अधिनियम अथवा महामंडळाचे जमीन विषयक अधिनियम / नियम / मार्गदर्शक तत्वे यांच्यानुसारच गैर अधिसूचित करण्यात आले आहे असे समितीला दिसून आले नाही.

**मुद्दा क्र २ इ )** उक्त क्षेत्र गैर अधिसूचित प्रकरणी Conflict of Interest निदर्शनास येतो का ?

**निष्कर्ष :** उक्त क्षेत्र गैर अधिसूचित प्रकरणी समितीला Conflict of Interest दिसून आले नाही.

**मुद्दा क्र.२ ई)** उक्त प्रकरणाच्या अनुषंगाने अन्य इतर महत्वाच्या त्रूटी / उणीवा निदर्शनास येतात का ?

**निष्कर्ष :** होय. उक्त प्रकरणांच्या अनुषंगाने अन्य अनेक महत्वाच्या त्रूटी / उणीवा समितीच्या निदर्शनास आल्या आहेत. त्याबाबत **प्रकरण क्र ७ - शिफारशीमध्ये** समितीने सविस्तर शिफारशी केल्या आहेत.

# प्रकरण ७

## शिफारशी

या संपूर्ण अहवालामध्ये विविध ठिकाणी विश्लेषण केल्याप्रमाणे, समितीला काही महत्त्वाच्या त्रुटी/उणिवा निदर्शनास आल्या, म्हणून समिती खालीलप्रमाणे शासनाच्या विचारासाठी शिफारशी करीत आहे:-

१. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ सुधारणा अधिनियम १९७४ (Maharashtra XVIII of 75, 15.9.1976) या प्रमाणे अधिनियमात जी सुधारणा करण्यात आली, त्यानुसार या सुधारणेच्या पूर्वी अधिसूचीत करण्यात आलेली जमीन या सुधारणेनंतर (१०) वर्षाच्या कालावधीत गैर अधिसूचीत करता येणे शक्य होती. तसेच वरील सुधारणेनंतर अधिसूचीत करण्यात आलेली जमीन या सुधारणेच्या (२०) वर्षापर्यंतच्या कालावधीत गैर अधिसूचीत करता येत होती. याचा अर्थ असा की जर उक्त कालावधीमध्ये काही कारणास्तव (उदा. शेतकऱ्यांचा विरोध, निधीची अनुपलब्धता, जमीनीची अनुपयुक्तता, इत्यादी बाबींमुळे) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने किंवा शासनाने अधिसूचीत केलेली जमीन अधिग्रहीत केली नाही, तर गैर अधिसूचीत करण्यासाठी या कालावधीनंतर कुठलाही वाव राहत नाही. या कालावधीनंतर जर जमीनी गैर अधिसूचीत करावयाच्या असल्यास, सध्या प्रकरण ६ मधील कलम ३२ मधील विविध उप कलमांचा वापर केला जातो. तेही तितकेसे योग्य नाही कारण अधिनियमाचा कलम १(३) प्रमाणे जे नियम करण्यात आलेले आहेत त्यातील नियम ३०आणि वरील कलम ३२ च्या तरतूदी यांच्यामध्ये विरोधाभास वाटतो. समितीला असे वाटते की ही सुधारणा तेवढीशी योग्य नाही. म्हणून खालीलप्रमाणे सुधारणा करण्याची शिफारस आहे.

अ) प्रकरण ६ लागू केल्यानंतर १५ वर्षात जर जमीन अधिग्रहीत करण्यात आली नाही तर प्रकरण ६ आपोआप निरस्त होईल असे समजण्यात यावे, जेणेकरुन महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळावर आणि शासनावर वरील कालावधीमध्ये शेतकयांकडून जमीन - अधिग्रहीत करणे अथवा न करणे या बाबत अंतिम निर्णय घेण्यासाठी सक्ती राहील.

ब) जर उक्त कालावधीमध्ये जमीन अधिग्रहीत करता येणे (काही कारणास्तव) शक्य झाले नसेल तर प्रकरण ६ ची अधिसूचना परत नव्याने करुन, पुढील १५ वर्षापर्यंत कालावधी वाढवता येईल. जर महामंडळाने किंवा शासनाने पुनअधिसूचना (Re-notify) करुन

K.P. Bakshi, IAS
Retd. Additional Chief Secretary
Government of Maharashtra
+91 9821927673, Email : kpbplang@gmail.com

37, Yashodhan,
Dinshaw Vaccha Road,
Churchgate,
Mumbai 400 020

प्रकरण क्र.७ – शिफारशी परिच्छेद १ पृष्ठ क्र.३६ येथील टंकलेखनातील चुक दुरुस्त करुन खालील प्रमाणे वाचावे :

1. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ सुधारणा अधिनियम १९७४ (Maharashtra XVIII of 75, 15.9.1976) या प्रमाणे अधिनियमात जी सुधारणा करण्यात आली, त्यानुसार या सुधारणेच्या पूर्वी अधिसूचीत करण्यात आलेली जमीन या सुधारणेनंतर २० वर्षाच्या कालावधीत गैर अधिसूचीत करता येणे शक्य होती. तसेच वरील सुधारणेनंतर अधिसूचीत करण्यात आलेली जमीन या सुधारणेच्या १० वर्षापर्यंतच्या कालावधीत गैर अधिसूचीत करता येत होती.

28/3/18

( के.पी. बक्षी )
निवृत्त अपर मुख्य सचिव
एक सदस्यीय समिती

प्रकरण ६ चा कालावधी वाढविला नाही तर शेतकऱ्यांच्या जमीनी आपोआप प्रकरण ६ मधून गैर अधिसूचीत होतील अशी तरतूद करणे उचित होईल.

म्हणजेच अधिनियम कलम १ च्या पोटकलम ३ मध्ये सध्याचा परंतुक काढून खालीलप्रमाणे परंतुक घालावे लागेल.

"(३) हा अधिनियम, त्याचे प्रकरण ६ खेरीज करुन, ताबडतोब अंमलात येईल; प्रकरण ६ हे राज्य शासन राजपत्रातील अधिसूचनेद्वारे त्याबाबतीत वेळोवेळी नेमून देईल त्या क्षेत्रात व त्या दिनांकापासून अंमलात येईल :

[1] [परंतु, जर राज्य शासनाच्या मते जेथे प्रकरण सह अंमलात आणले आहे अशा कोणत्याही क्षेत्राची किंवा त्याच्या कोणत्याही भागाची औद्योगिक क्षेत्र म्हणून विकसित करण्याच्या प्रयोजनासाठी, आवश्यकता पडण्याचा संभव नसेल तर, राज्य शासनास, तत्सम अधिसूचनेद्वारे, अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा दिनांकास, अशा दिनांकाच्यापूर्वी केलेल्या किंवा करण्याचे वर्जिलेल्या गोष्टीबाबत असेल त्याव्यतिरिक्त, त्या क्षेत्रात किंवा त्याच्या कोणत्याही भागात प्रकरण सहा अंमलात असण्याचे बंद होईल, असा निदेश देता येईल.

*[2][परंतु आणखी असे की, प्रकरण सहा अंमलात आणल्याच्या दिनांकापासून विहित करण्यात येईल अशा कालावधी मध्ये जर औद्योगिक क्षेत्र म्हणून विकसित करण्याच्या प्रयोजनासाठी जमीनी अधिग्रहीत करण्यात आल्या नाहीत तर पोट कलम (३) खाली प्रसिध्द केलेल्या राजपत्रातील अधिसूचना आपोआप निरस्त होईल.*

*परंतु आणखी असे की, राज्य शासनास नजीकच्या काळात निरस्त होणारी किंवा निरस्त झालेली अधिसूचना त्याच कालावधीसाठी पुनर्धिसूचीत करता येईल"*

२. महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रामध्ये जेंव्हा प्रकरण ची ६ अधिसूचना निर्गमित केली जाते तेंव्हा राजपत्राच्या शेवटच्या रकान्यात हे प्रकरण ६, कोणत्या तारखेपर्यंत लागू राहील याचा स्पष्ट उल्लेख करणे आवश्यक वाटते जेणेकरुन प्रत्येक जमीन मालकाला त्याची जमीन केंव्हापर्यंत अधिग्रहीत होऊ शकते आणि कोणत्या तारखेनंतर आपोआप अधिसूचना निरस्त होईल याची स्पष्टता राहील आणि या पूर्ण प्रक्रियेमध्ये अधिक पारदर्शकता येईल. जमीन मालकाला शासनाकडे किंवा महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडे किंवा शासनाच्या कोणत्याही प्राधिकाऱ्याकडे दाद मागण्यासाठी आणि जमीन गैर अधिसूचीत करुन घेण्यासाठी हेलपाटे घालावे लागणार नाहीत.

३.    नियम ३० हे पहिल्यांदा ४.२.१९७७ तारखेला निर्गमीत करण्यात आले. त्यानंतर २००९ मध्ये (८ जून २००९) नियम ३० मध्ये कालावधी वाढविण्यात आला. जुन्या प्रकरणांमध्ये (१५.९.१९७६ तारखेच्या अगोदर किंवा १५.९.१९७६ ला) ४० वर्षे आणि (१५.९.१९७६ तारखेनंतरच्या)प्रकरणामध्ये ३५ वर्षे अशी मर्यादा घालण्यात आली. एकंदर या सुधारणेच्या स्वरुपात जो कालावधी दिलेला आहे तो अत्यंत दीर्घ मुदतीचा असून अवाजवी आणि ठोस आधार नसलेला आहे असे समितीला वाटते.

वरील प्रमाणे कलम १ च्या पोट कलम ३ मध्ये सुधारणा केल्यास २००९ चे आणि १९७६ चे नियम बदलून नव्याने नियम करणे योग्य राहील.

४.  जमीन प्रकरण ६ प्रमाणे अधिसूचीत करण्यापूर्वी शासनाने एक उच्च स्तरीय समिती यांच्याकडून सल्ला घेऊन अधिसूचीत करण्याचा निर्णय ५.७.१९९६ च्या शासन निर्णया प्रमाणे घेतला. तथापि, जमीन गैर अधिसूचीत करण्यासाठी त्याच उच्च स्तरीय समितीचा सल्ला घेणे शासनाच्या वरील शासन निर्णयाप्रमाणे आवश्यक नाही. त्यामागची भुमिका समजू शकली नाही. म्हणजेच प्रकरण ६ अधिसूचीत करावयाची असेल तर अनेक विभागांचा सचिवांचा सल्ला घ्यावा परंतु गैर अधिसूचीत करावयाची असेल तर फक्त महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, उद्योग विभागाचे सचिव आणि मा. मंत्री उद्योग यांच्या स्तरावर निर्णय व्हावा असा भेद-भाव करणे योग्य नाही, असे समितीला वाटते. जर उच्च स्तरीय समिती मार्फत जमीन प्रकरण ६ प्रमाणे अधिसूचीत करावयाची असेल तर त्याच उच्च स्तरीय समितीमार्फत गैर अधिसूचीत करण्याची प्रकरणे सुध्दा हाताळली गेली पाहिजेत आणि त्या समितीच्या शिफारशीनुसार पुढची पावले उचलली गेली पाहिजेत असे समितीला वाटते. शासनाने याचा योग्य तो विचार करावा .

५.    कोणतीही जमीन महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या अधिनियमाच्या प्रकरण ६ प्रमाणे अधिसूचीत करावयाची असेल तर त्या भूखंडावर (साईटवर) एका अधिकाऱ्यांची समिती उपस्थित राहून त्यांनी त्या ठिकाणी सर्व गट क्रमांकाचा उल्लेख करुन, ती जमीन औद्योगिक वापरासाठी उपयुक्त आहे किंवा नाही याची चाचणी करुन शिफारस केली पाहिजे. तसेच सर्व गट नंबर चावडी वाचन करुन प्रसिध्द केल तर जमीन मालक त्यांचे आक्षेप उपस्थित करु शकतील व प्राथमिक स्वरुपात त्यांची बाजू समजून घेऊन जमीन अधिसूचीत करण्याचा निर्णय घेणे सोईस्कर होईल, असे समितीला वाटते. जमीन अधिग्रहीत करताना, प्रत्येक जमीन मालकाचे ऐकुन घेणे आणि त्यांच्या विनंती प्रमाणे मोबदल्यावर निर्णय घेणे या बाबी तर आहेतच परंतु सुरुवातीलाच जर जमीन मालकांचा प्रखर विरोध असेल तर प्रकरण ६ अधिसूचीत करण्यापूर्वीच या बाबींचे निराकरण करता येतील आणि पुढे जमीन अधिग्रहीत

करताना अडचणीला सामोरे जावे लागणार नाही व महामंडळाच्या आणि उद्योग विभागाचा महत्त्वपूर्ण वेळ वाया जाणार नाही. स्थानिक लोक प्रतिनिधींच्या निवेदनांवरही, जनसामान्यांची प्रतिक्रिया नोंदवून घेता येईल व प्रकरण ६ ची अधिसूचना उचित होईल किंवा नाही या बद्दल महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाला आणि शासनाला ठोस निर्णय घेता येईल.

६. प्रकरण ६ ची अधिसूचना मागे घेण्यासाठी अर्थात भूखंड किंवा जमीन गैर अधिसूचीत करण्यासाठी काही कायदेशीर तरतूदी लागू होतात. म्हणून जमीनी गैर अधिसूचीत करण्याच्या प्रकरणांत, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या विधी विभागाचे प्रमुख यांचा लेखी सल्ला घेणे आवश्यक आहे, असे समितीला वाटते. आतापर्यंतच्या चौकशीवरुन जमीन गैर अधिसूचीत करण्यासाठी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या जमीनीची प्रकरणे हाताळणाऱ्या विभागाने विधी विभागाच्या प्रमुखाचा सल्ला घेतला होता, असे दिसून आले नाही. किंबहुना महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या जमीनीची प्रकरणे हाताळणा-या विभागाच्या महा व्यवस्थापक यांनी असे उद्धृत केले की जमीन गैर अधिसूचीत करण्यासाठी महामंडळाच्या विधी विभागाचा सल्ला घेण्याची प्रथा नाही. समितीला असे वाटते की ही प्रथा चालू करावी.

# प्रकरण ८

## आभार

महाराष्ट्र विधी मंडळात, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाची मौजे गोंदे दुमाला, आणि वाडिवरे, ता. इगतपूरी, जि. नाशिक येथील अधिग्रहीत जमीन गैर अधिसुचीत करण्याच्या मा. मंत्री (उद्योग) यांनी घेतलेल्या निर्णयाबाबत सखोल चर्चा झाली आणि त्या अनुषंगाने एक सदस्यीय चौकशी समितीची स्थापना केली. या समितीवर माझी नियुक्ती केल्याबद्दल, सर्वप्रथम मी शासनाचे आभार मानतो. या समितीचे कामकाज करताना महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी, श्री. संजय सेठी, सह मुख्य कार्यकारी अधिकारी, श्री. विक्रम कुमार, श्रीमती वैदेही रानडे, महा व्यवस्थापक (भूसंपादन), श्री. यु.बी. देशमुख, क्षेत्र व्यवस्थापक (भूसंपादन) व विविध स्तरावरील अधिकारी/कर्मचारी यांनी वेळोवेळी घेतलेल्या बैठकीत उपस्थित राहून सविस्तर माहिती दिली व संबंधित नस्तीही उपलब्ध करुन दिल्या याबद्दल समिती त्यांनाही धन्यवाद देते. उद्योग विभागाचे अपर मुख्य सचिव श्री. सुनिल पोरवाल व इतर अधिकारी देखील वेळोवेळी उपस्थित राहिले आणि सखोल चर्चा केली. शासनाच्या स्तरावर उप सचिव, डॉ. ना.को. भोसले यांनी नस्ती व माहिती उपलब्ध करुन दिली आणि अत्यंत कमी कालावधीमध्ये मागील १५ वर्षापर्यंतची माहिती उपलब्ध नस्तींमधून माहिती काढून समितीला सादर केली, याबद्दल समिती त्यांनाही धन्यवाद देते. तसेच तत्कालीन मंत्री, उद्योग, श्री. नारायण राणे व सध्याचे मंत्री, उद्योग, श्री. सुभाष देसाई यांनी समितीला आवश्यक असलेली माहिती सविस्तर दिली, जेणेकरुन समितीला वरील अहवाल सादर करणे शक्य झाले. हा अहवाल सादर करण्याकरिता निवडलेल्या सर्व अधिकारी/कर्मचारी यांचेही समिती आभार मानते.

(के.पी. बक्षी)
निवृत्त अपर मुख्य सचिव
एक सदस्यीय चौकशी समिती